स्त्री

कुरआनच्या दृष्टिक्षेपात

* लेखक *

शमीमा मोहसीन

* भाषांतर *

अब्दुर्रहमान शेख

अनुक्रमणिका

पृष्ठ क्र.

	प्रस्तावना	४
१.	अरब अज्ञानकाळातील स्त्रीचे स्थान	७
२.	इस्लामी समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान	८
३.	सत्य साधनेत स्त्री-पुरुष एक समान आहेत	१०
४.	दांभिक पुरुष आणि दांभिक स्त्रीसाठी शिक्षा	१६
५.	स्त्री-पुरुषांसाठी नैतिक आदेश	२१
६.	स्त्रियांच्या भल्यासाठी पुरुषांना दिलेले आदेश	२४
७.	उत्कृष्ट मुस्लिम स्त्री आणि पत्नीची गुणवैशिष्ट्ये	२५
८.	सदाचारी स्त्रियांसाठी अल्लाहची कृपा	३०
९.	स्त्रीची योग्यता आणि पात्रतेसाठी गोशा (पडदा)	३२
१०.	पुरुषांना नजरानजरी करण्यापासून मनाई	३७
११.	स्त्रियांसाठी दृष्टीची जपणूक	४०
१२.	इस्लामी समाजातील सुधारणा	४४
१३.	स्त्रीचे आर्थिक हक्क	४९
१४.	स्त्री स्वसंरक्षण हक्क	५५
१५.	स्त्रियांनी अल्लाहला दिलेले वचन	६०
१६.	स्त्रियांची जबाबदारी	६२

॥ *अल्लाह असीम दयावंत व कृपावंत च्या नावाने* ॥

प्रस्तावना

अज्ञान युगात स्त्रीचा समाजाने विनाशाच्या खाईत कडेलोट केला होता आणि आजच्या तथाकथित ज्ञानी समाजाने तिला स्वातंत्र्याची भूल देऊन विनाशाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे हे सर्वज्ञात आहे. पुरातन काळात स्त्रीला जीवनहक्कांपासून वंचित ठेवले गेले तर आधुनिक काळात स्त्रीला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून चालण्याची प्रेरणा दिली. तिला घराच्या चार भिंतीतून बाहेर काढून बाजाराची शोभा बनवली. स्त्रीने आपली अब्रू नष्ट करून टाकली. ती स्वातंत्र्याच्या नावाने गुलाम बनून राहिली. आज पाश्चात्य समाजात स्त्री स्वातंत्र्याच्या नावाने त्रस्त बनली आहे. पाश्चात्य सभ्यतेमध्ये या खुल्या स्वातंत्र्याच्या परिणामस्वरुप बलात्कार आणि अनैतिकता शिगेला पोहचली आहे. आश्चर्य या गोष्टीचे आहे की, मुस्लिम स्त्रीसुध्दा आज या 'स्वातंत्र्याच्या' प्राप्तीसाठी कर्तव्यदक्ष आहे. इस्लाम तर कुरआनच्या माध्यमातून स्त्रीचे स्थान निश्चित करीत आहे. दिव्य कुरआन त्या सर्व दुराचारांना दूर करू इच्छितो ज्यामुळे आज स्त्रीशक्ती नष्ट होत आहे. कुरआन प्रत्येक रोगावर इलाज आहे. सर्व रोगांवर रामबाण उपाय आहे. कुरआन एक एक रोगाला ओळखून त्यावर उपाय सुचवितो. अमुक रोगापासून अमुक नुकसान व धोका आहे असा स्पष्ट इशारा कुरआन मनुष्याला देत आहे. जसे क्रोध बुध्दीला खाऊन टाकतो. द्वेष ज्ञानाला नष्ट करतो तसेच लालसा श्रध्देला खाऊन टाकते. अशा प्रकारे अनेकानेक रोग आहेत जे स्त्रियांमध्येसुध्दा आहेत. मानवतेला या सर्व रोगांपासून कशी मुक्ती प्राप्त होईल ह्यासाठी सर्वप्रथम आपल्या मनातून लालसा, द्वेष, मत्सर, क्रोध, चुगलखोरी, अहमभाव, गर्व, कंजुषपणा न्युनगंड इ. खतरनाक रोगांना दूर करणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण हे असे रोग आहेत जे मनुष्याचा विनाश करून सोडतात. स्त्री जर या रोगांनी रोगग्रस्त असेल तर ती यशस्वी होऊ शकणार नाही. म्हणूनच कुरआन व हदीसीमध्ये या रोगांपासून दूर राहण्याचे सक्त आदेश देण्यात आलेले आहेत. एखादी स्त्री या रोगांपासून मुक्त असेल तर तिच्या सहवासातील मुलेसुध्दा या दुर्गुणांपासून अलिप्त राहतील. अशी स्त्री उच्च प्रकारचे शिक्षण आपल्या मुलांना देते व त्याच प्रकारचा उच्च दर्जाचा समाज उत्पन्न होतो. ज्या प्रकारचा पवित्र समाज असेल तितकाच आदर—सन्मान स्त्रीचा त्या समाजात होतो. अशा समाजात स्त्री इज्जत व आदराच्या उच्च स्थानी विराजमान होऊन आपल्या कायमच्या वास्तव्याचे घर (स्वर्ग) साठी उच्चतर स्थानाची मालकीण बनते.

कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"जो कोणी सदाचरण करील मग तो पुरुष असो अथवा स्त्री परंतु ते श्रध्दावंत असावेत तर त्यांना आम्ही स्वर्गात दाखल करणार आणि कोणावरही कणभरसुध्दा अत्याचार होणार नाही." (सुरे निसा)

सुरे आलेइमरानमध्ये ईशआदेश आहे,

"त्यांच्या निर्माणकर्त्याने त्यांची प्रार्थना कबुल केली व फर्माविले की मी, कुणाच्या प्रयत्नांना वाया जाऊ देत नाही मग ती स्त्री असो की पुरुष."(आले इमरान)

अशाच प्रकारे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या मृत्युअगोदर उपदेश दिला आहे,

"मी तुम्हाला नाजुक अस्तित्वाबद्दल म्हणजे स्त्रियांबद्दल नसीहत करतो की, तुम्हापैकी उत्तम तो आहे जो स्त्रियांबरोबर सन्मानपूर्वक आचरण करतो. तुम्हांपैकी वाईट तो आहे जो त्यांच्याशी वाईटाने वागतो. इस्लाममध्ये स्त्री पुरुषासमान आहे. त्यांच्यात शरीराच्या अवयवाशिवाय काहीच फरक नाही. ते सृष्टीला उत्तम बनविण्यात एक दुसऱ्याची मदत करत राहतात. हक्क, जबाबदाऱ्या, मानवी स्वातंत्र्यात दोघेही सारखे वाटेकरी आहेत. स्त्रीची पवित्र भावना, नाजुकपणा आणि मोठी जबाबदारी पाहता दोघांमध्ये स्त्रीचे स्थान उच्चतर आहे.

इस्लामने स्त्रीच्या आदर-सन्मानाचा फक्त दावाच केला नाही तर ज्ञान व कर्म, तत्त्वज्ञानात, राजकारणात, शौर्य व हिमतीमधे तसेच संस्कृती-सभ्यतेमध्ये तसेच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने उभे केले. पुरुषामध्ये माननीय फारुख (र.), अबु बकर सिद्दीक (र.), अली हैदर (र.) असे उत्तमोत्तम आदर्श व्यक्तिमत्त्व जगासमोर मार्गदर्शनासाठी उभारले. त्याचप्रमाणे स्त्रियांमधून माननीय आयशा (र.), खदिजा (र.) सफीया (र.) फातेमा (र.) यांना ईशपरायणतेत, पावित्र्यात, ज्ञान व कर्मात अद्वितीय सिध्द केले. आता आपण पाहू या की कुरआनच्या दृष्टिकोनातून स्त्रीचे वास्तविक स्थान काय आहे आणि कुरआनने स्त्रीला कोणते स्थान बहाल केले आहे. तिला कोणते हक्क बहाल केले आहेत आणि तिच्यावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या कुरआनने टाकल्या आहेत. या पुस्तिकेत कुरआनच्या प्रकाशात स्त्रीच्या अस्तित्वाला उजागर करण्यात आले आहे. इस्लामने स्त्रीला सामाजिक, आर्थिक आणि संरक्षणविषयी जे हक्क बहाल केले आहेत त्यांचा सविस्तर उल्लेख येथे आला आहे.

तसेच ती एक स्त्री आहे या नात्याने तिचे आचरण कसे असावे आणि तिच्या जबाबदाऱ्या काय आहेत यावर प्रकाश टाकला आहे. या पुस्तिकेत स्त्रियांना त्यांचे हक्क आणि कायदेकानूबाबत जागृत केले आहे जे इस्लामने स्त्रियांसाठी कायम केले आहेत. मुस्लिम स्त्री या नात्याने तिच्यावर काय जबाबदाऱ्या येतात यांचा उहापोह करण्यात आला आहे. कुरआनच्या आयतींचा संदर्भ 'तफहीमुल कुरआन' मधून घेण्यात आला आहे. काही मोजके संदर्भ इतर ग्रंथातून घेण्यात आले आहेत. या पुस्तिकेचा विषय आहे ''स्त्री कुरआनच्या दृष्टिकोनातून'' म्हणूनच स्त्रियांबद्दलचे इतर वेगवेगळे दृष्टिकोन या पुस्तिकेत समाविष्ट नाहीत. फक्त कुरआन आदेशांनाच की जे स्त्रियांबद्दलचे आहेत अशांना संदर्भ म्हणून समाविष्ट केले आहे आणि खुलासा मौलाना अबुल आला मौदूदी यांचाच घेण्यात आलेला आहे. स्वत:चे त्यात काहीच नाही.

मी या ग्रंथाला स्त्रियांसाठी लाभकारक बनविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. परंतु हा माझा प्रथम प्रयत्न असल्याने चुका होणे साहजिक आहे. या तोडक्या मोडक्या प्रयत्नांना आपल्या पुढे ठेवून मी प्रार्थना करते की ईश्वरदरबारी माझ्या या प्रयत्नांना मान्यता प्राप्त होवो आणि वाचकांसाठी हे एक मार्गदर्शन आणि प्रेरणा ठरो. या पुण्यकार्यात ज्यांनी ज्यांनी माझी मदत केली त्यांना त्याचा उचित लाभ मिळो. वाचकांना ईश्वर या पुस्तिकेद्वारे जास्तीतजास्त लाभकारी सिध्द करो. विशेषत: स्त्रीजातीला तिचे हक्क आणि जबाबदाऱ्या समजण्यासाठी आणि त्यांना पार पाडण्यासाठी हा ग्रंथ प्रेरणा ठरो आणि ही पुस्तिका क्षमा व कृपा वर्षावाचे साधन ठरो. (आमीन)

लेखिका

शमीमा मोहसीन

अरब अज्ञानकाळात स्त्रीचे स्थान

कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे अल्लाहसाठी मुली निश्चित करतात पवित्र आहे अल्लाह! आणि यांच्यासाठी ते जे यांना हवे आहे? जेव्हा यांच्यापैकी एखाद्याला मुलीच्या जन्माची खुश खबर देण्यांत येते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर काळिमा पसरतो व तो रक्ता समान घोट गिळून बसतो. लोकांच्या पासून लपत छपत फिरतो की या वाईट बातमीनंतर कोणाला काय तोंड दाखवावयाचे, विचार करतो की अपमानित होऊन मुलीला घेऊन राहावे अथवा मातीत गाडावे? पाहा कसे वाईट निर्णय आहेत, जे हे ईश्वरासंबंधी लावतात."

(कुरआन–१६:५७-५९)

अरब अज्ञानकाळात अरब लोक मुलगी झाल्यानंतर स्वत:ला अशुभ समजत. कोणाच्या घरी मुलगी जन्माला आली तर तो लोकांपासून लपत छपत फिरत असे आणि लवकरात लवकर त्यापासून सुटका करण्याची इच्छा व्यक्त करत असे. मुलगी जन्माला आली की तो तिला मातीत पुरून देत असे. या अत्याचारींना त्यांच्या अत्याचारबद्दल अल्लाह परलोकात जरूर जाब विचारील. कारण अल्लाहच्या निर्मितीला जीवनहक्कांपासून वंचित ठेवण्याचा (ठार करण्याचा) कुणालाही हक्क नाही. कुरआनमध्ये याबाबतचा खुलासा परलोक वर्णनासोबत आला आहे.

"जेव्हा जीवंत पुरलेल्या मुलीशी विचारले जाईल, तुला कोणत्या कारणास्तव (कसुर) ठार करण्यात आले?"

जीवन ही ईश्वराची देन आहे. ईश्वराच्या मर्जीनुसार या जगात वागले पाहिजे. अज्ञानी अरबांनी ही अमानत (मुली) स्वत:नुसार वापरात आणली आणि या अबलांना नामुष्कीचे कारण समजून त्यांना जीवनहक्कांपासून परावृत्त केले. परंतु वास्तविकत: त्यांनी स्वत:वरच अत्याचार केला. त्यांना त्यांच्या या अत्याचाराबद्दल परलोकांत ईश्वरासमोर जाब द्यावाच लागेल. इमाम बुखारी यांनी माननीय उमर (र.) यांचे कथन लेखन केले आहे की "मक्कामध्ये आम्ही स्त्रियांना एकदम तुच्छ समजत होतो. परंतु मदीना शहरामध्ये स्त्रियांची कदर केली जात असे. जेव्हा इस्लाम धर्म जगात आला व अल्लाहने (ईश्वराने) पवित्र कुरआनच्या आयती (दिव्य प्रकटन) स्त्रियांविषयी अवतरित केल्या तेव्हा आम्ही स्त्रियांची कदर करू लागलो व त्यांना उच्च स्थान देऊ लागलो.

इस्लामी समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान

कुरआनमध्ये स्पष्ट आदेश आहे,

"लोकहो, आपल्या पालनकर्त्याच्या कोपाचे भय बाळगा ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आणि त्याच जीवापासून त्याची सहचारिणी बनविली आणि त्या आद्य जोडीपासून पुष्कळ स्त्री पुरुष जगात पसरविले." (कुरआन-४:१)

अध्याय 'सूरे निसा'मध्ये मानवी हक्कांबद्दलचा उल्लेख आला आहे आणि विशेषत: चांगल्या कौटुंबिक व्यवस्थेसंबंधी नियम स्पष्ट करण्यात आले आहेत. या अध्यायाचा प्रारंभच अशा उक्तीने होतो की एकीकडे अल्लाहच्या कोपाचा भय बाळगण्यास आणि त्याच्या नाराजीपासून दूर राहण्याची ताकीद करण्यात आली आहे आणि दुसरीकडे हे सत्य पटवून देण्यात आले आहे की समस्त मानवजात एकाच वंशाची आहे. प्रत्येकाचे रक्त मांस एकसमान आहे.

समाजबांधणीसाठी इस्लामने स्त्री-पुरुषांना समान हक्क बहाल केले आहेत आणि त्यांना इस्लामी समाज व्यवस्थेसाठी आवश्यक ठरविले आहे. मानववंशाचे अस्तित्वच या गोष्टीवर आहे की दोघांमध्ये ठोस आणि नियमित असे सामंजस्य स्थापित व्हावे म्हणून दोघांचे परस्परांविषयक हक्क एकसारखे आहेत.

अल्लाहचा आदेश आहे,

"आणि स्त्रियांसाठीसुध्दा चांगुलपणात तेच हक्क आहेत जे पुरुषांचे हक्क त्यांच्यावर आहेत."

इस्लामने दोघांना सारखे हक्क बहाल करून त्या दोघांना ईश्वरभक्तीकडे वळविले. त्या दोघांना दाखवून दिले की त्यांची मुक्ती अल्लाहच्या भक्तीत आहे. मानवतेला अल्लाहची भक्ती आणि आज्ञाधारकतेच्या मार्गावर आणून मानवाला श्रेष्ठतम स्थानाकडे मार्गस्थ होण्यास प्रवृत्त केले आहे.

कुरआनोक्ती आहे,

"जो कोणी सत्कृत्य करील मग तो पुरुष असो अथवा स्त्री जर तो श्रध्दावंत असेल तर असेच लोक स्वर्गामध्ये दाखल होतील आणि त्यांचा हक्क यत्किंचितही देखील हिरावून घेतला जाणार नाही." (कुरआन-४:१२४)

सुरे हुजुरामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे,

"लोकहो, आम्ही तुम्हाला एका पुरुष व एका स्त्रीपासून निर्माण केले आणि मग तुमची राष्ट्रे आणि वंश बनविले जेणेकरून तुम्ही एकमेकांना ओळखावे, वास्तविकत: अल्लाहजवळ तुमच्यापैकी सर्वांत जास्त प्रतिष्ठित तो आहे जो तुमच्यापैकी सर्वांत जास्त ईशपरायण आहे. निश्चितच अल्लाह सर्वकाही जाणणारा आणि खबर राखणारा आहे." (कुरआन-४९:१३)

या छोट्यांशा आयतीमध्ये अल्लाहने समस्त मानवजातीला उद्देशून तीन अत्यंत महत्त्वाच्या सत्य गोष्टी सांगितल्या आहेत. एक म्हणजे तुम्ही सर्व एक आहात. एक पुरुष आणि एक स्त्रीपासून तुमचा वंश चालत आला आहे. आज जगात जितके मानवी वंश आढळतात ते सर्व त्याच आद्य जोडीचे वंशज आहेत जे एका आई आणि पित्यापासून आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे मानववंश एक असूनसुध्दा तुमच्या एक राष्ट्रात आणि वंशामध्ये विभाजन स्वाभाविक होते. परंतु त्या स्वाभाविक विभाजनाचा पाया उच्चनीचतेवर, सभ्य आणि असभ्य, श्रेष्ठ आणि कनिष्ठतेवर अवलंबून नाही. एका वंशाने दुसऱ्या वंशावर श्रेष्ठत्व गाजवावे, गोऱ्यांनी काळ्या लोकांना तुच्छ लेखावे, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राला कनिष्ठ समजावे यासाठी हे स्वाभाविक विभाजन नव्हते. निर्माणकर्त्याने ज्या कारणांसाठी मानवजातीला राष्ट्रांत आणि वंशांत विभाजित केले ते फक्त आणि फक्त यासाठीच की त्यांनी एकमेकांना ओळखावे. तिसरी महत्त्वाची बाब ही आहे की मानवाच्या दरम्यान श्रेष्ठत्व हे चारित्र्यसंपन्नतेवरच आधारित आहे.

सत्य साधनेत स्त्री-पुरुष एकसमान आहेत

कुरआनमध्ये सूरे अहज़ाबमध्ये अल्लाहने स्पष्ट आदेश दिला आहे,

"खचितच जे पुरुष आणि ज्या स्त्रिया मुस्लिम आहेत, श्रध्दावंत आहेत, आज्ञाधारक आहेत, सत्यनिष्ठ आहेत, संयमी आहेत, अल्लाहच्या समोर झुकणारे आहेत, दान धर्म करणारे आहेत, उपवास करणारे आहेत आपल्या शीलांचे रक्षण करणारे आहेत, आणि मोठ्या प्रमाणात अल्लाहचे स्मरण करणारे आहेत, अल्लाहने त्यांच्यासाठी क्षमा आणि महान मोबदला तयार ठेवला आहे." (कुरआन-३३:३५)

आज्ञाधारक (मुस्लिम) समाजात राहणारे लोक ज्यांनी इस्लामला आपल्यासाठी जीवनपध्दती म्हणून स्वीकारले आहे आणि त्यांनी हे निश्चित केले आहे की या जीवनपध्दतीनुसार जीवन व्यतीत करील. दुसऱ्या शब्दांत, हे लोक इस्लामच्या जीवनपध्दतीविरुध्द आचरण करणार नाहीत तर त्यानुसार आज्ञाधारक बनून राहतील. त्यांची ही आज्ञाधारकता दिखावू स्वरुपाची आणि खोटी नाही तर मन:पूर्वक ते इस्लामचेच आज्ञाधारक बनून राहतात. त्यांची ही अटळ श्रध्दा आहे की आचार-विचारांचा हा मार्ग जो कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी दाखविलेला आहे, तोच सरळ आणि सत्य मार्ग आहे. त्याच्या आज्ञाधारकतेतच आपली मुक्ती आहे. ज्याला अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी चूक ठरविले त्याबद्दल त्यांचे मतसुध्दा हेच आहे की ते चुकीचे आहे. ज्याला अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अचूक ठरविले आहे त्याला त्यांची बुध्दीसुध्दा अचुक ठरविते. त्यांच्या मनाची आणि बुध्दीची ही स्थिती नाही की कुरआन आणि सुन्नत (प्रेषित मुहम्मद (स.) यांची करणी व कथनी) द्वारा जो आदेश प्राप्त होतो त्यास ते अयोग्य कदापि समजत नाही. त्या आदेशात कोणत्याच प्रकारचा फेरबदल करत नाहीत. जगाच्या रीतीरिवाजाप्रमाणे त्या आदेशाला परिवर्तीत करीत नाहीत की आपल्या मनाप्रमाणे त्यात काही बदल करीत नाहीत. हदीसमध्ये श्रध्दाशीलतेच्या स्वरुपाला स्पष्ट करताना प्रेषितकथन आहे,

"श्रध्दाशीलतेत परिपूर्णत्वाला पोहचला तो मनुष्य जो पूर्णत: स्वीकार करतो की अल्लाह त्याचा पालनकर्ता, निर्माणकर्ता, शासनकर्ता आहे आणि इस्लामच त्याची जीवनपध्दती आहे आणि आदरणीय मुहम्मद (स.) त्यांचे प्रेषित आहेत."

दुसऱ्या ठिकाणी याविषयी प्रेषित कथन आहे, *"तुम्हापैकी कोणीही श्रध्दावंत होऊच शकत नाही जोपर्यंत त्याची मनोकामना आणि अहम्‌भाव हा पूर्णत: माझ्यावर अवतरित झालेल्या जीवनपध्दती (इस्लाम) पुढे समर्पित होत नाहीत."*

इस्लामी समाजातील श्रध्दावंत स्त्री व पुरुष फक्त सश्रध्देय बनून थांबत नाहीत तर ते आज्ञाधारक बनतात. ते फक्त त्याला सत्य समजून असतात ज्यास अल्लाह आणि त्यांच्या प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सत्य म्हटले आहे. ज्याला अल्लाह आणि त्यांच्या प्रेषितांनी मनाई केली आहे असे आचरण ते करत नाहीत. आपल्या दैनदिंन जीवनात ते अल्लाह आणि प्रेषितांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करत राहतात. ते आपल्या कथनी आणि करनीत साधर्म राखून असतात. खोटारडेपणा, धोकेबाजी, अनैतिकता, फसवेगिरी या दुर्गुणांचा त्यांच्या जीवनव्यवहारात लवलेशसुध्दा दिसून येत नाही. त्यांची जिव्हा तेच उच्चारण करते ज्यास त्यांचे मन योग्य समजत असते. ते अयोग्य कृत्य आपल्या हातून होऊ देत नाहीत. दुसऱ्याशी ते सदाचाराने वागतात.

अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांनी दाखविलेल्या मार्गावर चालताना आणि अल्लाहच्या जीवनव्यवस्थेला (दीन) पूर्णरूपेन प्रस्थापित करण्यासाठी संकटांना ते समर्थपणे तोंड देतात. कोणतीही भीती, लालच अथवा मनोकामना त्यांना त्या सरळमार्गावरून दूर करू शकत नाही. अशी व्यक्ती गर्व अथवा मीपणापासून अलिप्त असते. त्याच्या नजरेसमोर हे सत्य सतत असते की मी अल्लाहचा दास आहे आणि दास्यता हाच माझा जीवनधर्म आहे. यापेक्षा अधिक माझी योग्यता नाही. याच कारणामुळे अशा माणसांची मनं आणि शरीर दोन्ही अल्लाहपुढे नतमस्तक झालेली असतात. त्यांच्यांवर ईशभय सतत प्रभावी ठरते. त्यांच्या वागण्यातून गर्व आणि मीपणा आत्मस्तुती दिसून येत नाही. ईशद्रोही लोकांचे एकही लक्षण त्यांच्या बोलण्यातून व वागण्यातून दिसून येत नाही. ते अल्लाहच्या मार्गात मन:पूर्वक आपली संपत्ती खर्च करतात. अल्लाहच्या गरजु दासांची मदत ते खुल्या दिलाने करतात. कोणी बेवारस, रोगग्रस्त, संकटग्रस्त, वृध्द व्यक्ती अथवा कोणी गरीब असहाय त्यांच्या वस्तीतून रिकाम्या हाती परतत नाही. अल्लाहच्या दीनला (जीवनपध्दतीला) सर्वोत्तम सिध्द करण्यासाठी आपल्या तन मन धनाला अर्पण करण्यास सतत तत्पर राहतात. ते व्यभिचाराच्या जवळसुध्दा फिरकत नाहीत. ते नग्नतेला आणि असभ्य पोषाखाला स्वीकारत नाहीत. अर्धनग्नता ही अगदी पातळ आणि घट्ट कपडे घालूनसुध्दा दिसून येते.

या श्रध्दावंत स्त्री-पुरुषांची ओळख ही असते की ते अल्लाहचे स्मरण सतत करतात. अल्लाहचे स्मरण करणे म्हणजे माणसाच्या जीवनाच्या दैनंदिन जीवनव्यवहारात अल्लाहचे नाव सतत यावे आणि अल्लाहचे स्मरण सतत होत राहावे. माणसाची ही स्थिती तेव्हाच होते जेव्हा त्याच्या मनात अल्लाहचे स्मरण घर करून बसते. मनुष्य स्वभावापलीकडे जाऊन हे 'ईशध्यान' त्याच्या मनात घर केल्यानंतरच त्याचे उठणे,

बसणे आणि इतर सर्व दैनंदिन कार्य ईशस्मरणाने पार पाडली जातात. जेवण करतेवेळी पहिला घास ईशस्मरण करूनच होईल. जेवण झाल्यानंतर लगेचच ईशस्तवन (अल् हम्दुलिल्लाह) करील. झोपतेवेळी, उठतेवेळी अल्लाहचे नाव घेईल. बोलण्या-चालण्यातसुध्दा अल्लाहचे नाव घेत राहील. आपल्या प्रत्येक जीवनव्यवहारात अल्लाहच्या मदतीची याचना करीत राहील. जीवनातील प्रत्येक देणगीसाठी आणि कृपासाठी अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करत राहतो. संकटसमयी अल्लाहच्या कृपेची अपेक्षा धरतो. वाईट गोष्टीपासून अल्लाहच्या कोपाचे भय बाळगून त्यापासून दूर राहील. अपराध अथवा पाप घडल्यास अल्लाहची क्षमायाचना करतो. गरजेपोटी अल्लाहसमोरच हाथ पसरणे त्याचे गुणवैशिष्ट्य आहे. सारांश, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आणि जीवनव्यवहारात अल्लाहच्या स्मरणापासून किंचितही अलिप्त राहात नाही. हाच स्वभावगुण इस्लामचा जीव आहे, इस्लामचा आत्मा आहे. इस्लामच्या इतर उपासनापध्दतींसाठी ठराविक वेळ निश्चित आहे. परंतु ही जीवनसाधना (अल्लाहचे निरंतर स्मरण) निरंतर जीवनभर चालणारी उपासनापध्दती आहे. नमाज, रोजे, हज व जकात निश्चित वेळेत अदा करून मनुष्य मुक्त होतो. परंतु ही एक अविरत व अंतहीन अशी जीवनोपासना आहे. या जीवनोपासनेमुळेच मानवी जीवनाचा मार्ग अल्लाहच्या मार्गाशी एकरूप होऊन जातो. अशा स्थितीत मानवी जीवनात ईशोपासना व मानवी जीवनव्यवहार एकमेकांशी तादात्म्य पावतात जसे निसर्गाशी रोपट तादात्म्य पावते. याउलट ज्या व्यक्तीचे जीवन हे 'ईशस्मरणाने' रिक्त आहे, त्याच्याकडून विशिष्ट वेळेत अदा केलेली उपासना म्हणजे त्या रोपट्यासारखीच आहे. ज्याला विषम हवामानात व विषम प्रदेशात वाढण्यासाठी लावण्यात आलेले आहे. माळ्याच्या विशेष लक्ष देण्यामुळे ते रोपटे तग धरुन आहे. या गोष्टीला आदरणीय प्रेषित मुहम्मद (स.) यांनी खालील शब्दांत वर्णन केले आहे,

"जेव्हा एका व्यक्तीने प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले, "जिहाद करणाऱ्यांपैकी सर्वांत श्रेष्ठ व्यक्ती कोण आहे?" उत्तरात प्रेषितांनी शिकवण दिली, "जो त्यांच्यापैकी अल्लाहचे स्मरण करण्यात अविरतपणे सर्वांत जास्त मग्न आहे." त्या व्यक्तीने पुन्हा प्रश्न केला, "रोजादार, नमाजी, हाजी आणि जकात देणारा यांच्यापैकी कोण श्रेष्ठ?" प्रत्येक वेळी प्रेषितांनी आदेशित केले, "जो कोणी अल्लाहला सर्वांपेक्षा जास्त स्मरण करत राहतो."

वरील हदीसवचन हे इस्लामचा आत्मा आहे. यात स्त्री-पुरुष असा भेद नाही. कर्तव्यक्षेत्रात जरी दोघांचे क्षेत्र वेगवेगळे आहे तरी वरील वैशिष्ट्यगुण (इस्लामचा आत्मा) म्हणजे अल्लाहचे निरंतर स्मरण दोघांमध्ये समान असेल तर अल्लाहच्या नजरेत

दोघे सारखे आहेत, दोघांना समान मोबदला आणि समान दर्जा बहाल होईल. दोघांत किंचितही अंतर राहणार नाही जरी एकाने घर सांभाळले आणि दुसऱ्याने राज्य! एकाने घरात राहून मुलांचा योग्य सांभाळ केला आणि दुसऱ्याने कुरुक्षेत्रात जाऊन अल्लाहच्या जीवनपध्दतीसाठी (इस्लामसाठी) प्राण पणाला लावले! इस्लाममध्ये स्त्रीचे कार्यक्षेत्र हे पुरुषापेक्षा वेगळे आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे, एकदा आदरणीय अस्मा (रजि.) यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले, "पुरुष तर जिहादसाठी मैदानात येतात आणि त्यांना शुक्रवारची सामुदायिक नमाज अदा करण्याचा आदेश आहे, पण स्त्रियांसाठी या दोन्ही गोष्टी अनिवार्य नाहीत, म्हणून तर पुरुष हे स्त्रियांपेक्षा जास्त पुण्यशील ठरतात." तेव्हा प्रेषितांनी या प्रश्नाला दाद देताना सांगितले, "इतका श्रेष्ठ आणि महत्त्वाचा प्रश्न मला आजतागायत विचारण्यात आलेला नाही. स्त्रियांनी घरात राहून आपल्या पतीची सेवा करावी आणि घराचे इतर अनिवार्य कार्य करत राहावे. आपल्या मुलाबाळांचा व्यवस्थित सांभाळ करावा त्यांना योग्यरित्या प्रशिक्षित करावे. असे केल्यानेच तुम्हाला श्रेष्ठतम मोबदला मिळेल. आपल्या कार्यक्षेत्रात राहून जी स्त्री सदाचार करील तिला योग्य मोबदला दिला जाईल. स्त्रियासाठी हाच जिहाद आहे.

मोबदल्यासाठी स्त्री-पुरुष एकसमान

अध्याय 'अल् मुअमिन'मध्ये अल्लाहचा स्पष्ट आदेश आहे,

"जो दुराचार करील त्याला तेवढाच बदला मिळेल जितका त्याने दुराचार केला असेल आणि जो सत्कर्म करील मग तो पुरुष असो अथवा स्त्री, तो श्रध्दावंत असावा, असे सर्व लोक स्वर्गामध्ये प्रविष्ट होतील. तेथे त्यांना अमाप उपजीविका दिली जाईल."

(कुरआन-४०:४०)

ज्याप्रमाणे स्त्रीला तिच्या करनीचा मोबदला पुरुषासमानच मिळतो आणि सदाचारामुळे स्वर्गात पुरुषाप्रमाणे प्रविष्ट होते. याचप्रमाणे शिक्षेसाठी स्त्री पुरुषासमान आहे. सदाचाराचा बदला आणि दुराचाराची शिक्षा देण्याचा कुरआनमध्ये जो आदेश आलेला आहे तो स्त्री आणि पुरुष या दोघांसाठी समान आहे. अध्याय 'जिलजाल'मध्ये हुकूम आहे,

"त्या दिवशी लोक विभिन्न स्थितीत परततील जेणेकरून त्यांची कृत्ये त्यांना दाखविली जातील. मग ज्याने तिळमात्र पुण्य केले असेल ते तो पाहील आणि ज्याने तिळमात्र पाप केले असेल तेही तो पाहील." (कुरआन-९९:८)

कुरआनमध्ये ठिकठिकाणी श्रध्दावंत स्त्री व पुरुष, दांभिक स्त्री व पुरुष, द्रोही स्त्री व पुरुष यांचे एकत्रितपणे वर्णन आले आहेत. त्यांना मोबदल्याची खूशखबर किंवा शिक्षेची तंबी दिली गेली आहे. जगात मानवाचे वास्तविक स्वरुप स्पष्ट केले आहे,

"आम्ही या अमानतीला आकाश, पृथ्वी व पर्वतासमोर ठेवले तर ते उचलण्यास तयार झाले नाहीत आणि तिच्याने भयभीत झाले परंतु मानवाने ती उचलली. नि:संशय तो मोठा अत्याचारी आणि अज्ञानी आहे. (या अमानतीचे ओझे उतरविण्याचा हा अपरिहार्य परिणाम आहे) की जेणेकरून अल्लाहने दांभिक पुरुषांना व स्त्रियांना आणि अनेकेश्वरवादी पुरुषांना व स्त्रियांना शिक्षा द्यावी आणि श्रध्दावंत पुरुषांचा आणि स्त्रियांचा पश्चात्ताप स्वीकारावा. अल्लाह क्षमाशील आणि परम कृपाळू आहे."

(कुरआन-३३:७२-७३)

वरील कुराणोक्तीद्वारे मानवाला सचेत करण्यात आले आहे की जगात त्याचे वास्तविक स्वरुप काय आहे? या स्वरुपात त्याने जर जगात बेजाबदारपणे जीवन खेळतमाशा समजून वाममार्ग स्वीकारला तर तो आपल्या हाताने त्याचे जीवन बरबाद करतो. अमानतीचा भार उचलण्यासाठी मनुष्य फक्त तयार झाला. येथे अमानत म्हणजे खिलाफत (अल्लाहचा प्रतिनिधी) ची जबाबदारी उचलण्यासाठी तयार झाला. अल्लाहने मानवाला विचार व आचारस्वातंत्र्य बहाल केले आहे आणि या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी अल्लाहने मानवाला सृष्टीतील इतर चराचरावर प्राधान्य बहाल केले आहे. परिणामत: मानव आपल्या कृत्यांसाठी स्वत: जबाबदार आहे. सदाचारासाठी चांगला मोबदला व दुराचारासाठी शिक्षा देणे स्वाभाविक आहे. हे स्वातंत्र्य अल्लाहने मानवाला बहाल केले आहे म्हणून मानव अल्लाहसमोर जाब देण्यास जबाबदार आहे.

अल्लाहचा प्रतिनिधी (खलीफा) ची अमानतची जबाबदारी किती श्रेष्ठतम आहे हे सिध्द करण्यासाठी अल्लाहने स्पष्ट केले की आम्ही या अमानतीला आकाश, पृथ्वी व पर्वतासमोर ठेवले तर ते उचलण्यास तयार झाले नाहीत आणि तिच्याने भयभीत झाले. परंतु मानवाने आपल्या छोट्याशा जीवावर हा मोठा भार उचलून घेतला. हा मोठा भार उचलण्यासाठी स्त्री व पुरुष दोघेही समसमान जबाबदार आहेत. दोघांचे जीवनध्येय अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करणे आहे. आकाश, जमीन व पर्वत इ. आपणासाठी बहिरे, मुके व निर्जीव आहेत, परंतु आवश्यक नाही की तें अल्लाहसमोर तसे असतील. अल्लाह आपल्या प्रत्येक निर्मितीबरोबर संवाद साधून आहे. या स्थितीला समजणे मानवबुध्दी पलीकडचे आहे. जमीन, आकाश आणि पर्वतासमोर अमानतीचा

हा भार अल्लाहने ठेवला आणि त्यांना तो उचलण्यास आदेश दिला, परंतु त्यास पाहून ते घाबरून गेले. त्यांनी आपल्या निर्माणकर्त्यासमोर याचना केली की आम्ही तुझेच सेवक बनून राहतो. आमच्यात हे बळ मुळीच नाही की आचार-विचारस्वातंत्र्य घेऊन हा भार उचलावा. यावरून मानवाला कळून येते की तो सृष्टीत किती नाजूक वळणार उभा ठाकला आहे. आता जो कोणी या परीक्षास्थळामध्ये बेजबाबदार आणि बेफिकीर बनून राहिला आणि या महान अशा अमानतीची जाणीव ठेवी नाही तर अशा या मूर्ख माणसाने स्वत:ला या जगात बेजबाबदार समजून बसला आहे. असा मनुष्य स्वत: अत्याचारी आहे, कारण तो स्वत:ला आणि स्वत:बरोबर इतरांचासुध्दा विनाशाच्या खाईत कडेलोट करत आहे.

परलोकातील सफलतेचे गमक

कुरआननुसार सफलतेचे निकष स्त्री आणि पुरुष दोघांसाठी एकसमान आहेत. या निकषाला प्राप्त केल्याशिवाय दोघांपैकी कुणालाही सफलता प्राप्त होऊ शकत नाही. कुरआनची स्पष्टोक्ती आहे,

"श्रध्दावंत पुरुष व श्रध्दावंत स्त्रिया हे सर्व एक-दुसऱ्याचे मित्र आहेत, भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टींपासून रोखतात, नमाज कायम करतात, जकात देतात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञाधारक आहेत, हे ते लोक आहेत ज्यांच्यावर अल्लाहचा कृपावर्षाव होणारच. खचितच अल्लाह सर्वांवर प्रभावी, चतुर व बुध्दिमान आहे. या श्रध्दावंत पुरुष व स्त्रियांसाठी अल्लाहचा वायदा आहे की त्यांना अशा बागा प्रदान करील ज्यांच्या खालून कालवे वाहात असतील आणि ते त्याच्यात सदैव राहतील. त्या सदाबहार बागांत त्यांच्याकरिता स्वच्छ निवासस्थाने असतील आणि सर्वांत श्रेष्ठ गोष्ट म्हणजे अल्लाहची प्रसन्नता त्यांना प्राप्त होईल हेच मोठे यश आहे."

(कुरआन-९: ७१-७२)

वरील संकेतवचनांत श्रध्दावंत स्त्री आणि पुरुष एक-दुसऱ्याचे मदतगार आहेत. ते भलाईचा आदेश देतात आणि वाईटापासून प्रतिबंध करतात. नमाज कायम करतात आणि जकात देतात. अल्लाह आणि त्याच्या प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनुसरण करतात. त्या लोकांवर अल्लाह अवश्य कृपादृष्टी करील. संस्कृती संवर्धनात स्त्री-पुरुषांचा समसमान वाटा आहे. समाजाच्या सुधार आणि बिघाडामध्ये दोघांचा वाटा आहे. यासाठी परीक्षास्थळ (जग) पासून दोघांतून एकाला विलग करणे मूर्खपणाचे लक्षण आहे.

दांभिक पुरुष आणि दांभिक स्त्रीसाठी शिक्षा

अल्लाहने कुरआनमध्ये दांभिक स्त्री-पुरुषांचा उल्लेखसुध्दा श्रध्दावंत स्त्री-पुरुषांप्रमाणे केला आहे. ते एकमेकांच्या कार्यात मददगार आहेत. अध्याय 'तौबा'मध्ये वर्णन आले आहे,

"दांभिक पुरुष व दांभिक स्त्रिया सर्व एकमेकांशी सारखेच आहेत. दुष्कर्माचा आदेश देतात आणि आपले हात सत्कर्मापासून रोखतात. हे अल्लाहला विसरले म्हणून अल्लाहदेखील त्यांना विसरला. निश्चितपणे हे दांभिकच अवज्ञाकारी आहेत."

(कुरआन-९:६७)

अशा या सर्व दांभिक स्त्री पुरुषांचे वैशिष्ट्य हे आहे की ते सर्व वाईटांशी जवळीक करून आहेत व भलाईशी शत्रुत्व ठेवून आहेत. जर कोणी वाईट कृत्य करत असेल तर त्यास प्रोत्साहन देणे, सल्ला देणे, त्यांच्याशी सहानुभूती दाखविणे त्यांची स्तुती करणे इ. सर्व करून मनापासून त्या वाईट कृत्यांत सामील होतात. तसेच दुसऱ्यांना त्यात भाग घेण्यास प्रवृत्त करतात. वाईट कृत्य दुसऱ्यांनी करत राहण्यातच हे दांभिक आपले भले समजतात. याउलट कोणी सदाचार करत असेल तर हे दांभिक लोक दु:खी होतात. त्याकडे इतरांना प्रवृत्त होताना (सदाचार करताना) त्यांना पाहवत नाही. सदाचारी लोकांच्या मार्गात अडथळे निर्माण करतात आणि हरतऱ्हेने लोकांना सदाचारापासून परावृत्त करतात. अशा दांभिक लोकांचा हात सदाचारासाठी खर्च करण्यासाठी धजत नाही. ते निषिद्ध कामात मग्न असतात आणि निषिद्ध मार्गातच खर्च करत राहतात. अशा दांभिक स्त्री-पुरुषांसाठी अल्लाहचा वादा आहे,

"या दांभिक पुरुष, स्त्रिया व अश्रध्दावंतांसाठी अल्लाहने नरकाग्नीचे वचन दिले आहे ज्यात ते सदैव राहतील, तेच यांच्यासाठी योग्य आहे. यांच्यावर अल्लाहचा धिक्कार आहे व यांच्यासाठी कायम राहणारी यातना आहे." (कुरआन-९:६८)

दांभिक स्त्री-पुरुषाकरिता नरकाग्नीची सदैव शिक्षा देण्याची धमकी दिली आहे. त्याचप्रमाणे श्रध्दावंत स्त्री-पुरुषांकरिता सफलतेची शुभवार्ता दिली आहे. ज्याप्रमाणे दांभिक एक वेगळी जमात आहे, त्याचप्रमाणे श्रध्दावंत लोकांचासुध्दा एक वेगळा समूह आहे. श्रध्दाशीलतेचे जाहीर प्रकटन आणि इस्लामी तत्त्वानुसार बाह्य वागणूक जरी दोघा समूहांची सारखी आहे तरी त्यांचा स्वभाव, त्यांचे चारित्र्य आणि विवेकबुध्दीमध्ये दोन टोकांचा फरक आढळून येतो. जेथे जिभेने श्रध्दाशीलतेचा दावा होतो, परंतु मन सच्च्या श्रध्दाशीलतेपासून रिकामे आहे. अशा ठिकाणी जीवनाचे संपूर्ण रंगढंग आपल्या

प्रत्येक कर्माद्वारे श्रध्दाशीलतेचाच फक्त दावा करतो. वर अत्तर (मुष्क) चे लेबल लावलेले तर दिसते, परंतु आत मात्र शेण भरलेले आहे. परंतु जिथे श्रध्दाशीलता आपल्या वास्तविक रूपात प्रभावीपणे साकारलेली आहे, अशा प्रत्येक जीवनव्यवहारातून मुष्क अत्तराचा सुगंध दरवळत असतो. श्रध्दाशीलता आणि इस्लामच्या नावाने वरील दोन्ही जनसमूहांना प्रथमदर्शनी एक समूह बनवून ठेवले आहे. परंतु दांभिक मुसलमानांचा स्वभाव, चारित्र्य, वागणूक आणि बुध्दीविवेक अगदी विरुध्द टोकाचे आहेत. सच्चा मुसलमान हा इस्लामचा खरा पाईक आहे. म्हणून दांभिकता बाळगणारे मुसलमान हा एक वेगळा जथ्था आहे. ज्यांची अल्लाहशी बेपर्वाही आहे, वाईटाशी सलगी आहे तर सच्चा मुसलमान याविरुध्द सदाचाराचा प्रचार प्रसार करणारा आणि वाईटाचा प्रतिबंध करणारा आहे. वाईटाचा तिटकारा करणारा आणि सदाचाराचा आदेश देणारा हा समूह अल्लाहच्या निरंतर सहवासात आणि स्मरणात वावरतो. अल्लाहचे निरंतर स्मरण हे त्याच्या मन आणि बुध्दीविवेकाचे एकमेव खाद्य आहे. अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यासाठी त्यांचे मन आणि हाथ सतत खुले असतात. अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे अनुसरण करणे त्याचे जीवनध्येय आहे. अशा या विरुध्द दिशेच्या जीवनशैलीने दांभिक मुसलमान व श्रध्दावंत मुसलमान यांचे स्पष्ट विभाजन केले आहे आणि त्यांना एकमेकांपासून विलग केले आहे. अल्लाह श्रध्दावंत व दांभिक लोकांना खूशखबर देत आहे,

''कोण आहे जो अल्लाहला कर्ज देईल? उत्कृष्ट कर्ज, जेणेकरून अल्लाह कित्येक पटीने वाढवून ते परत करील आणि त्याच्यासाठी उत्तम मोबदला असेल, त्यादिवशी जेव्हा की तुम्ही श्रध्दावंत पुरुषांना आणि स्त्रियांना पाहाल की त्यांचे तेज त्यांच्या पुढे पुढे आणि उजव्या बाजूने धावत असेल. (त्यांना सांगितले जाईल) 'आज खूशखबर आहे, तुमच्यासाठी' स्वर्ग असतील ज्यांच्या खालून कालवे वाहत असतील ज्यात ते सदैव राहतील. हेच आहे मोठे यश. त्या दिवशी दांभिक पुरुषांची आणि स्त्रियांची दशा अशी असेल की श्रध्दावंतांना म्हणतील, 'जरा आमच्याकडे पाहा जेणेकरून आम्ही तुमच्या तेजापासून काही लाभ घ्यावा.' परंतु त्यांना सांगण्यात येईल, 'मागे व्हा, आपले तेज कोठे अन्यत्र शोधा.' मग त्यांच्यादरम्यान एक भिंत टाकली जाईल, जिच्यात एक दार असेल, त्या दाराच्या आत कृपा असेल आणि बाहेर प्रकोप. ते (दांभिक) श्रध्दावंतांना ओरडून ओरडून सांगतील, 'आम्ही तुमच्यासमवेत नव्हतो काय?' श्रध्दावंत उत्तर देतील, 'होय, परंतु तुम्ही स्वत:च स्वत:ला उपद्रवात झोकले होते, संधीसाधूपणा केला, शंकेत गुरफटलेले राहिलात आणि खोट्या अपेक्षा तुम्हाला फसवीत राहिल्या,

येथपावेतो की अल्लाहचा फैसला आला आणि शेवटच्या वेळेपर्यंत तो मोठा फसवणूक करणारा तुम्हाला अल्लाहच्या बाबतीत फसवीत राहिला. म्हणून आज तुमच्याकडून एखादे प्रतिदान (फिदया) स्वीकारले जाणार नाही आणि त्या लोकांकडूनही नाही ज्यांनी उघड उघड द्रोह केला होता. तुमचे स्थान नरक आहे. तोच तुमची काळजी वाहणारा आहे. आणि हा अत्यंत वाईट शेवट आहे.'' (कुरआन-५७:११-१५)

अल्लाहची ही कृपा आहे की अल्लाहने मनुष्याला दिलेल्या धनसंपत्तीतून मनुष्याने जर अल्लाहच्या मार्गात खर्च केला तर अल्लाह त्यास आपल्यावरील कर्ज मानतो. अट ही की हा खर्च अल्लाहच्या प्रसन्नताप्राप्तीसाठीच केला जावा तो खर्च दिखाव्यासाठी, प्रसिध्दीसाठी अथवा स्वार्थासाठी केला जाऊ नये. कुणावर उपकार करण्यासाठी नव्हे तर फक्त अल्लाहसाठीच तो खर्च केला जावा. दुसऱ्याची मर्जी अथवा प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी तो खर्च केला जाऊ नये. फक्त अल्लाहसाठीच आणि त्याच्या प्रसन्नतेसाठी खर्च केला जावा. कुरआनोक्ती आहे की या कर्जासाठी अल्लाहने दोन प्रकारची वचने दिलेली आहेत.

१) अल्लाह या कर्जाची परतफेड अनेक पटीने आपल्या दासाला करील.

२) अल्लाह या कर्जाच्या बदल्यात उत्तम मोबदलासुध्दा प्रदान करील.

हदीसमध्ये अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) यांचे निवेदन आहे की जेव्हा ही आयत (संकेतवचन) अवतरित झाली आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या पवित्र मुखाद्वारे लोकांनी यास ऐकले तेव्हा अबू दहादा (रजि.) यांनी सांगितले, ''हे प्रेषित! काय अल्लाह आमच्याकडून कर्ज घेऊ इच्छितो? प्रेषित उद्गारले, होय! अबु दहादा! प्रेषितांनी आपले करकमल त्यांच्याकडे वळविले तेव्हा अबु दहादा यांनीसुध्दा आपला हात हातात दिला आणि सांगितले, ''मी माझी पूर्ण बाग अल्लाहला कर्ज म्हणून दिली आहे.'' अब्दुल्ला बिन मसऊद (रजि.) निवेदन करतात की बागेत खजुरीची सहाशे झाडे होती, तिथेच त्यांची मुलेबाळे राहात होती. प्रेषितांना वादा केल्यानंतर अबु दहादा (रजि.) सरळ घरी पोहचले आणि बाहेर उभे राहून आपल्या पत्नीला हाक मारली, ''हे वाहिदाची आई! बाहेर ये, मी ही पूर्ण बाग आपल्या निर्माणकर्त्याला कर्ज दिली आहे.'' पत्नी म्हणाली, ''हे वाहिदाचे पिता! तुम्ही नफ्याचा सौदा केला आहे.'' तत्क्षणी ते आपली मूलेबाळे आणि घरचे सामान घेऊन बाहेर पडले. (अब्ने अबी हातीम)

या विवेचनावरून हेच सिध्द होते की निखळ श्रध्दावंतांचा त्यावेळी किती प्रतिसाद होता. म्हणजे ते कशा प्रकारचे कर्ज होते ज्यास अनेक पटीने परतफेड करण्याचा आणि

त्या कर्जाच्या बदल्यात उत्तम मोबदलासुध्दा प्रदान करण्याचा अल्लाहचा वादा आहे, हे स्पष्ट होते. कुरआननुसार जीवनव्यवहारात स्त्री आणि पुरुष दोन्ही एकमेकांचे सहाय्यक आहेत. जीवनाच्या या ओझ्याला दोघांनी मिळून उचलून धरले आहे. दोघांच्या एकरूपतेतून जीवनाला अर्थ आला आहे. जीवन जगण्यायोग्य झाले आहे. जगातील कोणतीच चळवळ अथवा वंश दोघांमुळेच अर्थपूर्ण बनतो. दोघांपैकी एकालासुध्दा ते उपेक्षित करू शकत नाही. त्यांच्या यशात स्त्री आणि पुरुष दोघांचा समसमान वाटा आहे. त्याचप्रमाणे असत्याच्या आणि वाईटाच्या प्रगतीतसुध्दा दोघे सारखेच जबाबदार आहेत. यावरून हे स्पष्ट होते की तेज हे फक्त श्रध्दावंत स्त्री पुरुषांसाठीच असेल आणि दांभिक व अश्रध्दावंत स्त्री-पुरुषांसाठी काळाकुट्ट अंधार असेल. भटकण्यासाठी तेथे तेज व प्रकाश हा प्रत्येकाच्या कर्माचा असेल, सदाचाराचा असेल. श्रध्दाशील चारित्र्य हे पवित्र तेजात रुपांतरीत झालेले असेल, ज्यामुळे सदाचारी दासांना प्रकर्षाने ओळखले जाईल. ज्यांचे सदाचरण जितके जास्त तितके ते अधिक तेजस्वी असतील आणि जेव्हा ते हश्रच्या मैदानातून जन्नतकडे चालू लागतील तेव्हा त्यांचे तेज त्यांच्या पुढेपुढे असेल. प्रेषितवचन आहे,

''कुणाचे तेज इतके तेजस्वी असेल की मदीनेपासून सनापर्यंत ते असेल आणि कुणाचे तेज इतके मंद असेल की ते त्याच्या पायाशीच घुटमळत असेल.''(इब्ने जरीर)

ज्याच्यामुळे जगात जितका अधिक सदाचार फैलावला जाईल त्याचे तेज तितके अधिक तेजस्वी असेल आणि हश्रच्या मैदानात ते दूर अतिदूर फैलावत जाईल, ते त्यांच्या पुढे पुढे असेल. दांभिक अंधारात चाचपडत आणि ठोकर खात राहतील. जगात श्रध्दावंत आणि दांभिक लोक एकसाथ राहात होते. दांभिक श्रध्दावंतांना त्या वेळी ओरडून सांगतील की थोडे आमच्याकडेसुध्दा पलटून पाहा जेणेकरून आम्हाला काही प्रकाश दिसेल. श्रध्दावंत स्त्री व पुरुष एका महाद्वारातून स्वर्गात दाखल होतील आणि द्वार बंद केले जाईल. महाद्वाराच्या एकीकडे स्वर्गिय देणग्या असतील, तर दुसरीकडे नरकाग्नी असेल. दांभिकांना दोहोंतील अंतर पार करणे अशक्य होईल. अध्याय 'फतह' मध्ये अल्लाहने स्पष्ट नमूद केले आहे,

''जेणेकरून श्रध्दावंत पुरुष आणि स्त्रियांना सदैव राहण्यासाठी अशा स्वर्गामध्ये दाखल करावे ज्यांच्या खालून कालवे वाहत असतील आणि त्यांच्या वाईट गोष्टी त्यांच्यापासून दूर केल्या जातील. अल्लाहजवळ हे मोठे यश आहे आणि त्या दांभिक पुरुष आणि स्त्रियांना आणि अनेकेश्वरवादी पुरुष आणि स्त्रियांना शिक्षा द्यावी जेव्हा

अल्लाहच्या संबंधाने वाईट कल्पना बाळगतात. वाईटाच्या फेऱ्यात ते स्वत:च आले, अल्लाहचा कोप त्यांच्यावर झाला आणि त्याने त्यांचा धिक्कार केला आणि त्यांच्यासाठी नरक उपलब्ध करून दिले जे फारच वाईट स्थान आहे.'' (कुरआन-४८:६-७)

कुरआनमध्ये स्पष्टपणे श्रध्दाशीलतेचे सार्वजनिक वैशिष्ट्य सांगितले आहे. स्त्री-पुरुषांना वेगळे करून यासंदर्भात दाखविले नाही किंवा त्या दोघांना मिळणाऱ्या मोबदल्याविषयी अथवा शिक्षेविषयी वेगळे करून सांगितले नाही. कारण दोघेही त्यांच्या कर्मानुसार बक्षीस अथवा शिक्षेस पात्र आहेत. ज्या श्रध्दावंत स्त्रियांनी आपले पती आपली मुलेबाळे, आईवडील, भाऊबहिणींना अल्लाहच्या मार्गात लढण्यासाठी (जिहाद) प्रवृत्त केले आणि त्यांच्या पश्चात त्यांची मुलेबाळे, घरसंपत्ती, इज्जतअब्रूचा योग्यरित्या सांभाळ केला अशा श्रध्दावंत स्त्रियांना घरबसल्या त्यांच्या पुरुषाप्रमाणे जिहाद करण्याचा मोबदला मिळणार होता. त्यांचे लहानसहान गुन्हे अल्लाह माफ करील आणि स्वर्गात सर्व बेदाग दाखल होतील.

दांभिक स्त्री-पुरुषांना अल्लाह माफ करणार नाही कारण हे लोक तोंडी इस्लाम कबूल करून सर्वसामान्य मुस्लिमांना धोका देतात. जेव्हा अल्लाहच्या मार्गात तन मन धन अर्पण करण्याची वेळ येते तेव्हा निरनिराळे बहाणे बनवतात. जेव्हा प्रेषित मुहम्मद (स.) काबागृहाची प्रदक्षिणा (उमरा) करण्यासाठी आपल्या साथीदारांसह मक्का शहरी पोहचण्यासाठी निघाले तेव्हा मदीना शहरातील दांभिकांना वाटले होते की आता प्रेषित आणि त्यांचे सहकारी जीवंत परतू शकणार नाही. इतर अश्रध्दावंत आणि अनेकेश्वरवादींना वाटत होते की प्रेषित आणि त्यांच्या साथीदारांना उमरा करण्यापासून रोखणे म्हणजे त्या एकेश्वरवादी लोकांना शह देण्यासारखे आहे. या दोहोंतील गैरसमजामागे हा विचार कार्यरत होता की अल्लाहची मदत प्रेषित मुहम्मद (स.) आणि त्यांच्या साथीदारांसमवेत नाही आणि सत्य हे असत्याच्या ओझ्याखाली दबून जाईल. अल्लाह यासाठी आदेश देत आहे की तो दांभिक स्त्री-पुरुषांना जरूर शिक्षा देईल.

ज्या दुष्परिणामांपासून ते दूर जाऊ पाहात होते आणि त्यासाठी त्यांनी मनसुबे रचले होते त्यांच्या पकडीत हे दांभिक आणि अनेकेश्वरवादी शेवटी सापडले. असत्याची साथ देणारे मग ते पुरुष असो की स्त्रिया, ते दोन्ही शिक्षेस पात्र आहेत, कोणलाही सवलत दिली जाणार नाही, कारण समाजाची जडणघडण दोघांवर सारखीच अवलंबून आहे.

स्त्री-पुरुषांसाठी नैतिक आदेश

अल्लाहचा आदेश आहे,

"कोणत्याही श्रध्दावंत पुरुषाला आणि कोणत्याही श्रध्दावंत स्त्रीला हा अधिकार नाही की जेव्हा अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांनी एखाद्या बाबतीत निर्णय दिला असेल तर मग आपल्या त्या बाबतीत स्वत: निर्णय घेणे त्याच्या अखत्यारित असेल आणि जो कोणी अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांची अवज्ञा करील तर तो उघडपणे मार्ग भ्रष्टतेत पडेल." (कुरआन-३३:३६)

इस्लामने स्त्री आणि पुरुषासाठी एकच जीवनमार्ग आणि जीवनसंविधान निश्चित केले आहे. त्याने स्त्रीला अशक्त व पीडित समजून पुरुषाला वेगळे व झुकते माप दिलेले नाही. दोघांसाठी एक नियम आहे. इस्लामची शिकवण दोघांना उद्देशून आहे आणि इस्लाम दोघांना सारखेच आदेश देतो. इस्लाम मानववंश, जातीपाती, उच्चनीच अशा भेदाभेदमध्ये विभाजित नाही. स्त्री आणि पुरुष हे अल्लाहच्या लष्कराचे शिपाई आहेत. अध्याय 'हुजुरात'मध्ये अल्लाह आदेश देत आहे,

"हे लोकहो, ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, पुरुषांनी दुसऱ्या पुरुषाची टिंगल उडवू नये, शक्य आहे की ते त्यांच्यापेक्षा उत्तम असतील आणि स्त्रियांनीसुध्दा दुसऱ्या स्त्रियांची टिंगल उडवू नये, शक्य आहे की त्या त्यांच्यापेक्षा उत्तम असतील. आपापसात एकमेकांना टोमणे मारू नका आणि एकमेकांचा उल्लेख वाईट नावानेही करू नका. श्रध्दा ठेवल्यानंतर दुराचारात नाव मिळवणे फार वाईट गोष्ट आहे. जे लोक या वर्तनापासून परावृत्त होत नसतील ते अत्याचारी होत. हे लोकहो, ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, अधिक शंका घेण्यापासून दूर राहा कारण काही बाबतीत शंका घेणे हे पाप आहे. हेरगिरी करू नका आणि तुमच्यापैकी कुणीही कुणाची चहाडी करू नये. काय तुमच्यापैकी एखादा असा आहे की जो आपल्या मृत भावाचे मांस खाणे पसंत करील? पाहा, तुम्हा स्वत:ला याची घृणा वाटेल. अल्लाहच्या कोपाचे भय बाळगा, अल्लाह मोठा पश्चात्ताप स्वीकारणारा आणि परम कृपाळू आहे." (कुरआन-४९: ११-१२)

वरील आयतद्वारा श्रध्दावंतांना विश्वास आणि भरोसा देण्यात आला आहे की धर्माच्या पवित्र संबंधानुरुप त्यांच्यात जे बंधुत्वाचे नाते आहे. त्यास सदैव अबाधित राखण्यासाठी आणि आपापसातील संबंध दुरुस्त ठेवण्यासाठी दुराचारापासून दूर राहिले पाहिजे. वाईट सवयींमुळे समजास्वाथ्य बिघडून जाते.

एकमेकांच्या इज्जतअब्रूवर हल्ला करणे, मन दुखविणे, एकमेकांचे दोष काढत बसणे आणि शंकाकुशंका घेणे इत्यादींमुळे आपापसात दुरावा निर्माण होतो आणि पुढे जाऊन शत्रुत्वात त्याचे रुपांतर होते. इस्लाम प्रत्येक व्यक्तीला त्याचे मूलभूत हक्क प्रदान करतो, ज्यांच्यावर डाका टाकण्याचा कुणालाही अधिकार नाही. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर डाका टाकणाऱ्या व्यक्तीला इस्लाम अत्याचारी व गुन्हेगार ठरवितो. त्या वाईट सवयी ज्यांचे वर्णन वरील आयतमध्ये झाले आहे त्यात चेष्टा करणेसुध्दा सामील आहे. येथे तोंडी चेष्टा करणेच अपेक्षित नाही तर नक्कल करणे, हातवारे करणे, सोंग आणणे, त्याच्या पोशाखावर, चेहऱ्यावर व त्याच्या कामावर हसणे आणि त्याच्या अधूपणाकडे कुत्सिकतेने पाहणे व बोलणे इ. सर्व चेष्टेत सामील आहे. चेष्टेमध्ये दुसऱ्याला नावे ठेवणे व स्वत:ची बढाई अपेक्षित असते. अशा प्रकारची वागणूक समाजघातक आहे. म्हणून इस्लामने दुसऱ्याची चेष्टा करण्यास निषिद्ध ठरविले आहे.

वरील आयत मध्ये स्त्री आणि पुरुषांचा वेगवेगळा उल्लेख आल्याने त्याचा अर्थ हा होत नाही की पुरुषाने स्त्रीची आणि स्त्रीने पुरुषाची चेष्टा करावी. दोघांचा येथे स्वतंत्र्य उल्लेख यासाठी आला आहे की परपुरुष व परस्त्री कोणत्याही परिस्थितीत एकत्र येऊन हसणे, खेळणे व मेलमिलाफ करू शकत नाही, एक-दुसऱ्याची चेष्टा करू शकत नाही व टिंगल उडवू शकत नाही. मुस्लिम समाज या गोष्टीची कुणालाही परवागनगी देत नाही. त्याचप्रमाणे आपापसात टोमणे मारणे, एकमेकांचा उल्लेख वाईट नावाने करणे, बदनामी करणे इ. वाईट सवयींमुळे परस्परातील संबंध बिघडून जातात आणि समाजात बिघाड निर्माण करतात म्हणून त्यांना इस्लामने निषिद्ध ठरविले आहे. दुसऱ्यांना नावे ठेवणारा खरे तर स्वत:लाच बदनाम करतो. दुसऱ्याची बदनामी तेव्हाच केली जाते जेव्हा त्याच्या मनात त्या व्यक्तीबद्दल द्वेष निर्माण होतो. यासाठीच दुसऱ्यांना नावे ठेवणारा व बदनाम करणारा सर्वप्रथम स्वत:वरच अत्याचार करतो. तो दुसऱ्यांना प्रताडित करतो म्हणजे तो स्वत: दुसऱ्यांना आपल्यावर वार करण्यास प्रवृत्त करतो. एखादी सभ्य व्यक्ती आपल्या सभ्यपणामुळे त्याच्यावर वार करणार नाही ही वेगळी गोष्ट आहे. परंतु त्या व्यक्तीने आपल्याकडून तसे करण्याची मुभा स्वत:हून दिली आहे.

तिसरी अनैतिक गोष्ट (वाईट सवय) कुणाला टोमणे मारणे आहे. अल्लाहचा आदेश आहे की- कुणा दुसऱ्याला वाईट संबोधन करू नका. कुणाला दांभिक म्हणणे, कुणाला आंधळा, नकटा, काना म्हणणे, कुणाला त्याच्या अथवा त्याच्या खानदानाच्या अधुपणामुळे अथवा तुटीमुळे नाव ठेवणे, नवमुस्लिमास त्याच्या पूर्वजांच्या नावाने टोमणे देणे इत्यादी इस्लामने निषिद्ध ठरविले आहे.

एका श्रध्दावंतासाठी हे अत्यंत वाईट आहे की त्याने वाईटामध्ये नाव कमवावे. एक अश्रध्दावंत लोकांची टिंगल करण्यात अथवा टोमणे मारण्यात प्रसिध्द आहे तर हे जरी माणुसकीच्या विरुध्द असले तरी त्याच्या श्रध्दाहीनतेला ते शोभून दिसते. परंतु एक श्रध्दावंत एक अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) आणि परलोकावर श्रध्दा ठेवल्यानंतर असे हीन आणि दुष्ट प्रकरणात प्रसिध्दी मिळवू शकतच नाही.

याचप्रमाणे स्त्री-पुरुषांना जास्त शंका घेण्यापासून रोखण्यात आले आहे. त्याचे कारण आहे की काही बाबतीत शंका घेणे हे पाप आहे. कारणाशिवाय दुसऱ्यावर शंका घेणे पाप आहे. दुसऱ्याबद्दल मत बनविण्याअगोदर शंका घेणे आणि सदाचारी लोकांबद्दल शंका घेत राहाणे पाप आहे. याचप्रमाणे कुणाच्या आचरणात व स्वभावात वाईटाचाच शोध घेत राहणे पाप आहे.

आणखी एक नैतिक आदेश अल्लाहने दिला आहे तो म्हणजे दुसऱ्याची हेरगिरी करू नका, कुणीही कुणाची चहाडी करू नका. दुसऱ्याच्या वैयक्तिक जीवनात डोकावणे, दोघांचे संभाषण चोरून ऐकणे, इ. पाप गोष्टी आहेत त्यांना निषिद्ध ठरविले आहे. चहाडीविषयी प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे,

''चहाडी ही आहे की तू आपल्या भावाचा असा उल्लेख करावा ज्याला तो नापसंत करतो.''

यावर विचारणा केली गेली, ''माझ्या बंधुमध्ये तसे आढळून आल्यास जे मी सांगितले आहे. तेव्हा आपला काय आदेश आहे?''

उत्तरात प्रेषितांनी स्पष्ट केले, ''त्यात ती गोष्ट आढळली तरी तू त्याची चहाडीच केली आणि ती गोष्ट त्यात नाही तर तू त्याची नामुष्की केली.''

अशा स्थितीत एखाद्याविषयी त्याच्या पश्चात त्याचे वाईट वर्णन करण्याची मुभा इस्लाम आवश्यकतेनुसारच देतो. कारण अत्यंत वाईट अत्याचार तो आहे जो एका मुस्लिमाच्या इज्जतीवर विनाकारण हल्ला केला जातो. सुधार करण्यासाठी एखाद्याचे वाईट वर्णन करणे, कुणाच्या वाईट कृत्यांचे वर्णन इतरांसमोर यासाठी करणे की ते त्या वाईटांपासून दूर राहावेत. दुराचारी लोकांचा जे समाजासाठी विनाशकारी आहेत, प्रतिबंध करणे, कुप्रथा आणि असे लोक जे ईश्वरदासांना ईश्वराच्या मार्गापासून बळजबरीने परावृत्त करत आहेत, अशा सर्वांचा समाचार घेण्याची इस्लाम माणुसकीच्या कल्याणासाठी मुभा देतो.

स्त्रियांच्या भल्यासाठी पुरुषांना दिलेले आदेश

समाजात स्त्रियांचे स्थान आणि पात्रतेनुसार अल्लाह पुरुषांना आदेशित करत आहे,

"तुमच्या पत्नी तुमच्यासाठी शेती (तुमचा वंश वृध्दी करणाऱ्या जननी) आहेत. जेव्हा तुमची इच्छा होईल तेव्हा (वंशवृध्दीच्या भावनेने) तिच्याकडे जा. आणि आपला वंश पुढे चालवा आणि ईश्वरी कोपाचे भय बाळगा आणि जाणून असा की तुमची त्याच्याशी भेट होणार आहे. आणि श्रध्दावंतांना शुभवार्ता सांगा."

(कुरआन-२:२२३)

याचाच अर्थ हा होतो की अल्लाहने स्त्रियांना पुरुषासाठी कुरण बनविले नाही तर दोघांमध्ये शेतीचा आणि शेतकऱ्याचा संबंध जोडला आहे. शेतात शेतकरी फक्त फिरण्यासाठी जात नाही, तर शेतीपासून उत्पन्न घेण्यासाठी जातो. मानववंशाच्या शेतकऱ्यालासुध्दा मानवतेच्या या शेतात यासाठी गेले पाहिजे की वंशवृध्दी झाली पाहिजे आणि मानवीवंश पुढे चालला पाहिजे.

पुरुषांना आदेश दिला गेला की आपल्या भविष्याची काळजी घ्या. त्याचे दोन अर्थ निघतात आणि दोन्ही महत्त्वाचे आहेत.

१) आपली वंशवृध्दी पुढे चालवा जेणेकरून तुम्ही जगाचा निरोप घेण्यापूर्वी तुमच्या जागी दुसरे काम करण्यासाठी (तुमचे कार्य पुढे नेण्यासाठी) तयार झाले पाहिजेत.

२) येणाऱ्या ज्या वंशाला तुम्ही आपल्या जागी बसवणार आहात त्यांना नैतिकतेच्या आणि मानवतेच्या गुणवैशिष्ट्यांनी सुशोभित करावे.

वरील दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्यास तुम्ही हलगर्जीपणा केला तर अल्लाह तुम्हाला जाब विचारील. एके ठिकाणी कुरआनमध्ये अल्लाहने फर्माविले आहे, "ते (स्त्रिया) तुमच्यासाठी आणि तुम्ही त्यांच्यासाठी पोशाख आहेत." जणूकाही कुरआन हे सांगू इच्छितो की पुरूषांच्या जीवनात अनेक असे प्रसंग येतात त्या वेळी स्त्रियांची आवश्यकता भासते आणि स्त्रियांना पुरुषांची गरज भासते. दोघांतील संबंध जिव्हाळ्याचे, प्रेमाचे आहेत, द्वेषाचे आणि रागाचे मुळीच नाहीत. हा संबंध द्वेषभावनेसाठी वा मत्सरासाठी तर मुळीच नाही.

उत्कृष्ठ मुस्लिम स्त्री आणि पत्नीची गुणवैशिष्ट्ये

कुरआनमधील अध्याय 'तहेरिम'मध्ये अल्लाहने स्पष्ट केले आहे,

"दूर नव्हे की नबी (स.) यांनी तुम्हा सर्व पत्नींना तलाक दिला तर अल्लाह त्याला अशा पत्नी तुमच्याऐवजी प्रदान करील ज्या तुमच्यापेक्षा उत्तम असतील. खऱ्या मुसलमान, श्रध्दावंत, आज्ञाधारक, पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्या, उपासना करणाऱ्या आणि उपवास करणाऱ्या, मग पतीचा स्पर्श झालेल्या असोत की कुमारिका."

(कुरआन-६६:५)

तात्कालिन समाजात प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या पत्नी श्रेष्ठतम स्त्रिया होत्या तरी त्या सर्व मानव होत्या. त्या ईशअवतरणाने (दिव्य प्रकटन) अनभिज्ञ होत्या. कधी त्यांना आपले साधे जीवन जगणेसुध्दा असह्य होत असे आणि त्या संयम न पाळता प्रेषितांना आपल्या अधिकाराची जाणीव करून देत. उदरनिर्वाहासाठी तगादा लावीत असत.

यावर अल्लाहने अध्याय 'अहजाब'मध्ये फर्माविले,

"तुम्हाला जर भौतिक सुख अपेक्षित असेल तर माझा प्रेषित स्वत:हून तुम्हाला मोकळे करील. जर तुम्ही अल्लाह आणि त्याचा प्रेषित (स.) आणि परलोकावर विश्वास व श्रध्दा ठेवत असाल तर संयम राखा आणि अल्लाहचे स्तुतिगान करत कष्ट झेलत राहा."

कधीकधी मानवी स्वभावानुरुप त्यांच्याकडून विपरित घडले जात असे. यामुळे प्रेषितांचे वैयक्तिक जीवन अबाधित राहावे आणि ते महत्कार्य जे अल्लाहने प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर सोपवलेले होते त्याला बाधा पोहचू नये म्हणून वरील दिव्य प्रकटन झाले आहे. जेणेकरून अनुयायींच्या मातांमध्ये आपल्या श्रेष्ठत्वाची आणि जबाबदारींची प्रखर जाणीव निर्माण व्हावी. जे प्रेषितांच्या पत्नी म्हणून त्यांना प्राप्त झालेले होते. त्यांनी स्वत:ला इतर सामान्य स्त्रियांसारखे आणि स्वत:च्या घराला इतरांच्या घरांसारखे समजू नये. वरील आयतची सुरुवात अशी आहे की ती ऐकून आदरणीय मातांचे हृदय हेलावले असेल. या आदेशापेक्षा मोठी आणखी तंबी काय असू शकते?

"जर नबी (स.) यांनी तुम्हाला तलाक दिला तर अल्लाह त्याला अशा पत्नी तुमच्याऐवजी प्रदान करील ज्या तुमच्यापेक्षा उत्तम असतील."

प्रथमत: प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यापासून सोडचिठ्ठी (तलाक) घेणे हेच त्यांच्या

जिवावर बेतणारे होते आणि त्यांच्याकडून 'अनुयायींची माता' ही उपाधीसुध्दा काढून घेतली जाणार होती. तसेच 'दुसऱ्या पत्नी तुमच्याऐवजी प्रदान करील ज्या तुमच्यापेक्षा उत्तम असतील.' यावरून हेच सिध्द होते की नंतरच्या काळात त्यांच्या हातून काही विपरीत घडेल. कुरआनमध्ये अशा तंबी त्यांच्यासाठी फक्त दोनच ठिकाणी आलेल्या आहेत. याद्वारे उत्कृष्ठ मुस्लिम स्त्रीचे गुणवैशिष्ट्य सांगितले गेले आहे.

उत्कृष्ठ पत्नीचे वैशिष्ट्य विशद करताना तिला मुस्लिम, श्रध्दावंत, आज्ञाधारक, पश्चात्ताप व्यक्त करणारी, उपासना करणारी आणि रोजा (उपवास) करणारी म्हटले आहे. मुस्लिम आणि श्रध्दावंत हे शब्द जेव्हा एकत्रित येतात तेव्हा मुस्लिमचा अर्थ होतो अल्लाहचा आदेश पाळणारे आणि श्रध्दावंताचा (मोमीन) चा अर्थ होतो सच्चा श्रध्दावंत. म्हणून उत्कृष्ठ मुस्लिम स्त्रीचे वैशिष्ट्य आहे की ती सच्चा दिलाने अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) आणि त्यांनी बहाल केलेल्या जीवनप्रणालीवर (इस्लामवर) श्रध्दा ठेवते आणि व्यावहारिकतेत अल्लाहचा आदेश पाळणारी असते. एकीकडे ती अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) यांची आज्ञाधारक तर दुसरीकडे आपल्या पतीची आज्ञाधारक असते.

जेव्हा त्यांच्याकडून गुन्हा घडला तर ती अल्लाहपाशी आपल्या गुन्ह्याची कबुली देऊन माफी मागत असते. त्या स्त्रीचे मन सतत सजग असते. तिला आपल्या कमतरतेची सतत जाणीव असते. अशा व्यक्तीत कधीच गर्व. स्वप्रशंसा बढाई निर्माण होत नाही. तर ती व्यक्ती सोज्ज्वळ आणि प्रेमळ बनते. धार्मिक मनुष्य कधीही ईश्वरासंबंधी हलगर्जीपणा करत नाही. निधर्मी मनुष्य मात्र ईशद्रोहीच असतो. एका स्त्रीला उत्कृष्ठ पत्नी बनविण्यात याचे अत्यंत महत्त्व आहे. धार्मिक असल्याने व आज्ञाधारक असल्याने ती अल्लाहने घालून दिलेल्या सीमेचे कधीही उल्लंघन करत नाही. हकदारांचे हक्क ओळखून असते व त्या हक्कांना अदा करत जाते. तिची श्रध्दाशीलता सदैव ताजीतवानी व जीवंत असते. त्यामुळे ती अल्लाहच्या आदेशाचे पालन करत जाते.

उत्कृष्ठ पत्नीचे शेवटचे वैशिष्ट्य म्हणजे ती रोजा (उपवास) ठेवणारी असते. याचा अर्थ असा होत नाही की ती फक्त रमजानचेच रोजे ठेवते तर ती अनिवार्य उपवासाबरोबर ऐच्छिक उपवास (रोजे) करते. वैवाहिक जीवनाला सुखी आणि समाधानी बनविण्यासाठी जशी पतीची काही जबाबदारी आहे तशी ती पत्नीचीसुध्दा आहे. हे पवित्र बंधन तेव्हाच कृपाशीलतेचा आणि दयाशीलतेचा स्रोत बनतो जेव्हा दोघेही बाह्य आणि आंतरिक सौख्य ठेवून त्या बंधनाला दृढ करतात.

अध्याय 'निसा'मध्ये अल्लाहचा आदेश आहे,

''ज्या प्रामाणिक स्त्रिया आहेत त्या आज्ञाधारक असतात आणि पुरुषांच्या गैरहजेरीत अल्लाहच्या देखरेखीत व संरक्षणात त्यांच्या हक्कांचे रक्षण करतात.''

(कुरआन-४:३४)

कुटुंबाची देखभाल, मुलाबाळांचे योग्य संगोपण आणि कौटुंबिक स्वास्थ्य वैवाहिक जीवनात पत्नीची वागणूक अनुकूल असण्यावर अवलंबून आहे. पत्नीच्या सदाचाराचे फळ फक्त भौतिक फायद्यात पाहून चालत नाही. ती अल्लाहचा आदेश मानून आपली वागणूक अनुकूल आणि योग्य ठेवेल तर तिचे प्रत्येक कृत्य ईश्वराची आराधना सिध्द होते आणि ती स्त्री परलोकात यशस्वी ठरेल.

घराला घरपण देण्यासाठी पतीच्या कुवतीकडे लक्ष देऊन हसत खेळत त्याची आज्ञा पाळणे अत्यावश्यक आहे. परंतु स्त्री हेसुध्दा लक्षात ठेवते की ही अल्लाह आणि त्याच्या प्रेषिताची आज्ञा आहे आणि आज्ञाधारकाला अल्लाहची प्रसन्नता आणि स्वर्गप्राप्ती होते. तर अशा प्रकारची आज्ञाधारकता ही त्या कुटुंबापुरतीच मर्यादित न राहता त्यांचे प्रत्येक पाऊल त्यांना स्वर्गाच्या जवळ आणत जाईल आणि ती स्त्री पतीच्या प्रसन्नतेत अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करत राहील.

उत्कृष्ठ पत्नीचे आणखी एक वैशिष्ट्य हे आहे की ती आपल्या पतीच्या गैरहजेरीत अल्लाहच्या देखरेखीत पतीच्या हक्कांचे आणि त्याच्या अमानतीचे संरक्षण करते. यात ते सर्व समाविष्ट आहे जे पत्नीजवळ अमानत म्हणून आहे आणि पती आपल्या पत्नीला त्यासाठी संरक्षक म्हणून पाहतो. धनसंपत्तीचे संरक्षण, इज्जतअब्रूचे संरक्षण, पतीच्या गुपितांचे रक्षण, वाद्यांचे रक्षण करणे यात सामील आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांची याबाबत शिकवण आहे,

''उत्कृष्ठ पत्नी ती आहे जिला पाहून पती खूश होतो, जेव्हा पती तिला आदेश देतो तर ती त्या आदेशाचे पालन करते आणि जेव्हा पती घराच्या बाहेर असतो तेव्हा ती आपल्या मुलाबाळांचे, संपत्तीचे आणि तिच्या इज्जतअब्रूचे रक्षण करते.''

दुसऱ्या एके ठिकाणी प्रेषित मुहम्मद (स.) यांनी शुभवार्ता दिली आहे,

''स्त्री जेव्हा पाच वेळा नमाज अदा करते, आपल्या इज्जतीचे रक्षण करते आणि पतीची आज्ञा पाळते तर तिने ज्या द्वारातून आवडेल तिथून स्वर्गात प्रवेश करावा.''

अवज्ञाकारी स्त्रियांना प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सावध केले,

''अल्लाह कयामतच्या दिवशी त्या स्त्रीकडे ढुंकूनसुध्दा पाहणार नाही जी पतीची अवज्ञा करणारी असेल. जेव्हा की पत्नी आपल्या पतीशी कधीही प्रतारणा करू शकतच नाही. एक चांगली पत्नी वैवाहिक जीवनाला समृध्द बनवते.''

अल्लाहच्या आदेश आहे,

''जर एखाद्या स्त्रीला आपल्या पतीकडून वाईट वागणूक अथवा उपेक्षेचे भय असेल तर यामध्ये काहीही हरकत नाही की पती-पत्नी (काही हक्कांच्या कमी अधिक प्रमाणावर) परस्परात तडजोड करतील. कोणत्याही परिस्थितीत तडजोड अधिक चांगली आहे.'' (कुरआन-४:१२८)

जीवनभराच्या वैवाहिक जीवनात पत्नीला आपल्या पतीपासून वाईट वागणूक अथवा उपेक्षेचे भय लागून असते. त्याचा एक परिणाम म्हणजे दोघांची कायमची ताटातूट आणि दुसरा परिणाम हा दोघांतील तडजोड आहे. इस्लामला ताटातूट (तोड) पसंत नाही जोड पसंत आहे. हे उत्कृष्ट आहे की दोघांनी परस्परात तडजोड करावी. काही हक्कांना कमी-अधिक करून आपल्या स्वभावाला मुरड घालून तडजोडीला तयार व्हावे. 'जीवनाचा काही भाग दोघांनी जसा एकत्र घालविला तसेच हे उरलेले जीवन एकत्रितपणे जगून पूर्ण करू या.' हा निर्धार दोघांचा होणे यासाठी अत्यावश्यक आहे.

उत्कृष्ठ पत्नी ही मानवतेचे खास वैशिष्ट्य आहे आणि मानवी सभ्यतेची खास ऊर्जा आहे. उत्कृष्ट पत्नी तीच आहे जी अल्लाहच्या मार्गात पतीची सहाय्यक बनते. आणि संकटांना मोठ्या धैर्याने आणि संयमाने तोंड देत पतीची साथ निभावते. प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

''सर्व जग हे फायद्यासाठीची मिळकत आहे परंतु उत्तम मिळकत ही सदाचारी पत्नी आहे.''

वास्तविकपणे सदाचारी पत्नी ही श्रेष्ठ देणगी आहे. ती फक्त भौतिक जीवनासाठी आत्मिक समाधान ठरते असे नाही तर परलोकाच्या यशासाठीच्या तयारीत आणि अल्लाहच्या आज्ञाधारकतेत पतीची सहाय्यक बनून राहते. इस्लामच्या इतिहासात अशा श्रेष्ठ पत्नींची अनेक उदाहरणे सापडतात. अनेक उदाहरणांपैकी एक उदाहरण येथे पाहू या.

दि. ७ ऑक्टोबर इ. स. ६६५ रोजी आदरणीय नाईला यांचा निकाह उस्मान (रजि.) यांच्याशी झाला. त्यांचे वडील आमिर बिन सोहल हे अरबस्थानचे प्रसिध्द

श्रीमंत व्यापारी होते. आपल्या लाडक्या मुलीच्या जन्मदिवशी आनंदाने त्यांनी एक हजार दिनार खर्च केले होते. त्या अत्यंत सुंदर आणि शालीन तर होत्याच परंतु प्रगाढ विद्वानसुध्दा होत्या. लग्न झाल्यानंतर त्या पतीसेवेत मग्न झाल्या. त्यांचे पतीवर अतोनात प्रेम होते. पतीचे कपडे आपल्या हाताने धूत असत, त्यांच्या कपड्यांना सुगंध लावत असत आणि रोज बिछाना टाकत असत. पती घरात आल्यावर त्वरीत त्यांच्या सेवेत हजर होत असत. त्याच्याजवळ बसून प्रेमाच्या दोन गोष्टी करत असत. पती जेवण करतेवेळी त्याला पंख्याने हवा देत असत. ती श्रीमंत घराण्याची लाडात वाढलेली होती तरी आपल्या पतीची ती सच्ची सेवक होती. जेव्हा विद्रोही लोकांनी उस्मान (रजि.) यांच्यावर हल्ला केला तेव्हा आदरणीय नाईला (रजि.) यांनी प्रथम तलवारीचा वार आपल्या हातावर झेलला होता. हाताची बोटे कापली जाऊन इतरत्र विखुरली गेली. त्या बेशुद्ध होऊन जमिनीवर पडल्या. सत्य आहे की उत्कृष्ट पत्नी या जगाची सर्वश्रेष्ठ मिळकत आहे.

सदाचारी स्त्रियांसाठी अल्लाहची कृपा

अध्याय 'वाकिया' मध्ये अल्लाहने स्पष्टपणे वर्णन केले आहे,

''त्यांच्या पत्नी आम्ही विशेष प्रकारे नव्याने निर्माण करू आणि त्यांना कुमारिका बनवू आपल्या पतीच्या प्रिय आणि वयात समवयस्क, हे असे उजव्या बाजूवाल्यांसाठी आहे, ते पुढच्यांपैकी पुष्कळ असतील आणि मागच्यांपैकीदेखील पुष्कळ.''

(कुरआन-५६:३९-४०)

वरील आयतीद्वारे अल्लाहला अपेक्षित जगातील सदाचारी स्त्रिया आहेत, ज्या आपल्या श्रध्दाशीलतेच्या आणि सदाचाराच्या बळावर स्वर्गात दाखल होतील, त्या आपल्या पतीसाठी अतिप्रिय आणि वयात समवयस्क, अल्लाह त्या सर्वांना जवान (तरूण) बनविल. मग भले त्या जगात सुंदर असो अथवा नसो त्यांना सुंदर बनविले जाईल. तसेच स्वर्गात त्यांना कुमारिका बनविले जाईल मग त्या जगात कुमारिका असो अथवा नसो की मुलबाळेवाल्या असोत. त्यांचे पती जर स्वर्गात दाखल होतील तर स्वर्गात त्यांचा मिलाफ होईल अन्यथा अल्लाह त्यांना इतर जन्नतीबरोबर लग्न लावून देईल. याविषयी प्रेषित मुहम्मद (स.) यांचे कथन आहे,

एका म्हातारीने प्रेषित मुहम्मद (स.) यांना विनंती केली की तिला स्वर्गप्राप्तीसाठी आशीर्वाद द्यावा. त्यावर प्रेषितांनी स्पष्ट केले. ''स्वर्गामध्ये एकही म्हातारी राहणार नाही.'' हे ऐकून ती रडत रडत निघून गेली. तेव्हा प्रेषितांनी लोकांना सांगितले, ''तिला सांगा की म्हातारी बनून स्वर्गमध्ये दाखल होणार नाही, तर अल्लाहचा आदेश आहे की त्यांना आम्ही विशेष प्रकारे नव्याने निर्माण करू आणि त्यांना कुमारिका बनवू.''

या संदर्भाने जगातील त्या सदाचारी आणि श्रध्दावंत स्त्रिया आहेत ज्या कुमारिका अथवा आई व आजी बनून होत्या.

यावर आदरणीय सलमा (रजि.) यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले, ''जगात जर एका स्त्रीचे एकपेक्षा जास्त पती असतील तर स्वर्गात कसे होईल?''

प्रेषित उत्तरले, ''तिला स्वातंत्र्य दिले जाईल की तिने ज्याला हवे त्याला निवडावे, जो जगात सर्वांत जास्त सदाचारी होता. ती अल्लाहपाशी प्रार्थना करील, जगात या पुरुषाची माझ्याशी सर्वांत चांगली वागणूक होती यासाठी त्याचीच पत्नी बनव.''

सदाचाराने इहलोक आणि परलोकाची सर्व भलाई लुटली आहे. स्वर्गातील स्त्रियांचे हे वैशिष्ट्य सांगितले आहे की त्या आपल्या पतीच्या अत्यंत प्रिय असतील.

त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य हे आहे की त्या समवयस्क असतील आणि सदैव त्याच वयात (कुमारिका) राहतील.

एका हदीसचे कथन आहे,

"स्वर्गात दाखल होणाऱ्यांच्या शरीरावर केस नसतील. दाढी वाढलेली, गोरेपान सदृढ बांधा आणि डोळे शर्मिले असतील. सर्वांचे वय ३३ वर्षांचे असेल."

अल्लाह आपल्या सदाचारी दासांना स्वर्गाची शुभवार्ता देत आहे आणि स्वर्गातील सुखसोयींचा उल्लेख करताना या कुमारिकांचा उल्लेख आला आहे.

"या ऐश्वर्यादरम्यान लाजाळू नजरवाल्या असतील, ज्यांना या स्वर्गस्थ लोकांच्या अगोदर कधी कोणा मानवाने अथवा जिन्न (अदृश्ययोनि) यांनी स्पर्श केलेला नसेल."

(कुरआन-५५:५८)

स्त्रियांची हीच खरी ओळख आहे ती बेशरम आणि बिनधास्त कधीच नसते. ती लाजाळू नजरेची असते. म्हणून अल्लाहने स्वर्गाच्या ऐश्वर्यादरम्यान स्त्रियांचा उल्लेख करताना सर्वप्रथम त्यांच्या सुंदरतेचा नव्हे तर त्यांच्या पावित्र्याचा आणि लाजाळूपणाचा उल्लेख केला आहे. सुंदर स्त्रिया तर क्लबमध्ये आणि सिनेसृष्टीत अनेक सापडतात आणि दुराचारी आणि दुष्ट मनुष्यच त्यांचा उपभोग घेतो, सदाचारी नव्हे. म्हणून एका सदाचारी भल्या माणसाला तरी सुंदरता आकृष्ट करूच शकत नाही जी दुष्टांना आणि दुराचारी पुरुषांना निमंत्रण देत राहते.

स्वर्गस्थ स्त्री गुणवैशिष्ट्य विशद करताना स्पष्ट केले गेले आहे की ती जगात कुमारिका असो अथवा कुणाची पत्नी परंतु स्वर्गात सदाचारी स्त्री तरूण आणि कुमारिका बनविली जाईल आणि ती पवित्र्य व लाजाळू असेल. स्वर्गमध्ये सदाचारी पुरुषाप्रमाणे सदाचारी जिन्नसुध्दा असतील. पुरुषासाठी मानवी स्त्रिया आणि जिन्नासाठी जिन्न स्त्रिया तेथे असतील. दोघांसाठी त्यांचे समवयस्क जोडे असतील सर्व पवित्र असतील.

स्त्रीची योग्यता आणि पात्रतेसाठी गोशा (पडदा)

कुरआनमध्ये अल्लाह फर्मावित आहे,

"नबी (स.) च्या पत्नीनों! तुम्ही सामान्य स्त्रियाप्रमाणे नाहीत. जर तुम्ही अल्लाहचे भय बाळगणाऱ्या असाल तर हळू आवाजात बोलत जाऊ नका की विकृत हृदयाचा एखादा माणूस लालसेत पडेल. तर स्पष्ट सरळ आवाजात बोला. आपल्या घरात टिकून राहा आणि गत अज्ञानमूलक काळाप्रमाणे शृंगाराचे प्रदर्शन करीत फिरू नका. नमाज कायम करा, जकात द्या, अल्लाह आणि त्याचे पैगंबर (स.) यांचे आज्ञापालन करा. अल्लाह तर हे इच्छितो की तुम्ही पैगंबराच्या घरवाल्यांपासून घाण दूर करावी आणि तुम्हाला पूर्णपणे पवित्र करावे. आठवण ठेवा अल्लाहच्या संकेताची आणि बुध्दिमत्तेच्या त्या गोष्टींची ज्या तुमच्या घरात ऐकविल्या जातात, नि:संशय अल्लाह सूक्ष्मदर्शी आणि खबर राखणारा आहे." (कुरआन-३३:३२-३४)

वरील कुरानोक्तीत प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या पत्नींशी संवाद साधला गेला आहे. परंतु हेतु मात्र सर्व मुस्लिम स्त्रियांसाठी तो आदेश आहे. प्रेषितांच्या घरातून याचे अनुकरण झाले तर इतर सर्व मुस्लिम घरात त्याचे आपोआप अनुकरण केले जाईल हा हेतु त्यामागे कार्यरत आहे. समस्त मुस्लिमांना एक आदर्श घर म्हणून प्रेषितांचे घर आजही आहे आणि पुढेही राहणार आहे, अल्लाहचा हेतु फक्त अनुयायींच्या आदरणीय मातांच फक्त घाणीपासून मुक्त व्हाव्यात असा नव्हता तर तमाम मुस्लिम स्त्रिया दुर्वर्तनाच्या घाणीपासून अलिप्त राहाव्यात, त्यांनी नमाज कायम करावी, जकात द्यावी. तसेच घरात टिकून राहावे व परपुरुषाशी दबक्या आवाजात बोलू नये, हे आदेशसुध्दा आम आदेश आहेत. "तुम्ही सामान्य स्त्रियांप्रमाणे नाहीत." याचा अर्थ असा मुळीच नाही की सामान्य स्त्रियांनी खूप नटून थटून बाहेर पडले पाहिजे, परपुरुषाशी सलगी केली पाहिजे, एखादा बाप आपल्या मुलाला बजावतो,

"तू बाजारी मुलासारखा नाही की शिवीगाळ करावी."

याचा अर्थ तर असा होत नाही ना की तो मनुष्य फक्त आपल्या मुलाने शिवीगाळ करण्यासच वाईट समजतो आणि इतरांनी तसे केल्यास वाईट समजत नाही. मुस्लिम स्त्रीला आवश्यकता भासल्यास परपुरुषाशी बोलण्यास परवानगी दिली आहे. परंतु दबक्या आवाजात नव्हे की समोरच्या माणसाच्या मनात त्यामुळे वाईट हेतु त्या स्त्रीबद्दल निर्माण व्हावा. बोलण्यात स्त्रीने लचक, गोडवा आणि दबका आवाज वापरु नये, ज्यामुळे ऐकणाऱ्याच्या भावना भडकतील आणि त्याने त्या दिशेने आगेकूच करावी.

अशा घाण संवादशैलीबद्दल अल्लाह मुस्लिम स्त्रिला तंबी देत आहे की हे अशा स्त्रीला शोभा देत नाही जिच्या मनात अल्लाहच्या कोपाचे भय आहे. ही संवादशैली घाणेरड्या स्त्रियांची आहे. मुस्लिम स्त्रीची मुळीच नाही. अध्याय 'नूर' मध्ये अल्लाहचा आदेश आहे,

''हे पैगम्बर (स.) श्रध्दावंत स्त्रियांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टीची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. आणि आपला साजशृंगार दर्शवू नये त्याव्यतिरिक्त जे सहजासहजी प्रकट होईल आणि आपल्या छातीवर आपल्या ओढणीचा पदर घालून ठेवावा. त्यांनी आपला साजशृंगार प्रकट करु नये परंतु या लोकांसमोर, पती, पिता, पतीचे वडील, आपली मुले, पतीची मुले, भाऊ, भावांची मुले, बहिणींची मुले, आपल्या मेलमिलाफाच्या स्त्रिया, आपल्या दासी, गुलाम, ते हाताखालचे पुरुष जे एखादा अन्य प्रकारचा हेतु बाळगत नसतील आणि जी मुले जे स्त्रियांच्या गुप्त गोष्टींशी अद्याप परिचित झाले नसतील. त्यांनी आपले पाय जमिनीवर आपटत चालू नये की जेणेकरुन त्यांनी जो आपला शृंगार लपविला आहे त्याचे ज्ञान लोकांना होईल.'' (कुरआन-२४:३१)

यावरुन हेच सिद्ध होते की स्त्रियांनी आपला आवाज अथवा आपल्या साजशृंगाराचा झंकार परपुरुषाला मुळीच ऐकवू नये. परपुरुषाशी संवाद करणे आवश्यक झाले तर काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठीच स्त्रीला अजान देणे अवैध आहे. तिला नमाजामध्ये लुकमा (इमामने चूक केल्यास अल्लाहु अकबर म्हणणे) देण्याचीसुद्धा परवानगी नाही, तर तिने हातावर हात मारुन आवाज करावा जेणेकरुन इमाम सावध व्हावा. इथे हा विचार करण्यासारखा आहे की जो धर्म स्त्रीला परपुरुषाशी बोलताना लचकदार आणि मृदु आवाजात न बोलण्याचा आदेश देतो आणि परपुरुषासमोर विनाकारण बोलण्याची परवानगीही देत नाही. काय तो धर्म याला पसंत करील की स्त्री स्टेजवर यावी, नाचावी, गाणे गात राहावी आणि अंगप्रदर्शन करत राहावी? आकाशवाणी आणि दूरदर्शनवर मधुर व भावुक शृंगारिक भावना भडकतील अशा प्रकारे वागावे व बोलावे? इस्लाम स्त्रीला यासाठी स्टेजवर येण्याची अथवा पार्टी व क्लबची शोभा बनण्याची परवानगी देत नाही. पुरुषांशी पार्टीमध्ये मेलमिलाफ व हसीमजाक करण्याची इस्लाम स्त्रीला कदापिही परवानगी देत नाही. कुरआनच्या नजरेत या घाणीला वाव नाही. स्त्रीला घरात टिकून राहण्याचा आदेश दिला गेला आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र हे तिचे आपले घरदार. तिला आपल्या या कार्यक्षेत्रात राहून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत तिने घराला घरपण प्रदान केले पाहिजे. तिने घराबाहेर आवश्यकतेनुसारच पडले पाहिजे. हे कुरआननुसार आणि प्रेषित मुहम्मद (स) यांच्या

हदीसनुसारच आहे.

हदीसमध्ये वर्णन आहे की एकदा स्त्रियांनी प्रेषित मुहम्मद (स) यांना प्रश्न विचारला, ''सर्व श्रेष्ठता व प्रधानता तर पुरुषांच्याच बाजूने आहे. ते जिहाद करतात, अल्लाहच्या मार्गात महान कार्य करतात. आम्ही काय करावे की आम्हीसुद्धा मुजाहिदसमान श्रेष्ठता प्राप्त करावी?'' उत्तरादाखल प्रेषितांनी फर्माविले, ''जी तुम्हांपैकी घरात बसून राहील ती मुजाहिदचे श्रेष्ठत्व प्राप्त करील.'' तरीपण आवश्यकतेनुसार स्त्री घराबाहेर पडू शकते. प्रेषित मुहम्मद (स) यांचा आदेश आहे की स्त्रीच्या आवश्यकतेनुसार घराबाहेर पडण्यास तिला परवानगी आहे. मुजाहिद (योद्धा) अल्लाहच्या मार्गात मनापासून लढू शकतो जेव्हा त्याला आपल्या घराबद्दल आत्मविश्वास असेल. त्याची पत्नी त्याच्या मुलांचा सांभाळ करण्यास सक्षम असेल आणि ती आपल्या इज्जतअब्रूची त्याच्या गैरहजेरीत रक्षक असेल. अशी स्त्री घरबसल्या जिहादचे पुण्य प्राप्त करील. प्रेषित मुहम्मद (स) यांचे कथन आहे, ''स्त्री गुप्त (लपवलेली) वस्तु आहे. ती जेव्हा घराबाहेर पडते तेव्हा सैतान तिला टक लावून पाहतो आणि अल्लाहच्या कृपेच्या जवळ ती घरात असल्यावरच राहते.''

कुरआन व हदीसच्या या अगदी स्पष्ट आदेशाने याच काय वाव (शक्यता) उरतो की मुस्लिम स्त्री आमदार, खासदार तसेच समाजसेवक, सरकारी नोकर बनून परपुरुषांबरोबर फिरावे व राहावे, कॉलेजमध्ये इतर मुलांबरोबर ज्ञान घ्यावे, दवाखाण्यात नर्स बनावे, हवाईसुंदरी बनावे आणि ज्ञान प्राप्त करण्यासाठी एकटीने इग्लंड-अमेरीकेला जावे? स्त्रीला बाहेर पडण्यासाठीच्या परवानगीबद्दल आदरणीय माता आयशा (रजि.) यांनी जमलच्या युद्धात भाग घेतला होता. परंतु हा दाखला देणाऱ्या लोकांना हे माहीत नाही की आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे स्वत:चे मत याबाबतीत काय होते? आयेशा(रजि.) कुरआन पठण करताना या कुरआनोक्तीवर येऊन थांबल्या (घरात टिकून राहा) आणि ओक्साबोक्सी रडू लागल्या की त्यांची ओढणीसुद्धा ओलीचिंब होत असे. या कुरआनोक्तीमुळे त्यांना त्यांची ती चूक लढाईत सामील होण्याची आठवत असे.

स्त्रियांना आदेश देण्यात आला की अज्ञानकाळाप्रमाणे साजशृंगार करुन बाहेर फिरत जाऊ नका. स्त्रीसाठी अरबीत 'तबर्रुज' हा शब्द जेव्हा वापरला जातो तेव्हा त्याचे तीन अर्थ निघतात. 'तबर्रुज' म्हणजे लपलेले उघडे करुन दाखविणे असा शब्दश: अर्थ आहे.

१) तिने आपला चेहरा आणि अंगप्रदर्शन लोकांसमोर करावे.

२) तिने पोशाखाचा आणि दागदागिन्यांचा शृंगार लोकांसमोर उघडा करावा.

३) तिने आपल्या चालढाल आणि चटकमटकने आपल्याला दुसऱ्यासमोर उघडे करावे.

'तबर्रुज' चा दुसरा शब्दश: अर्थ मटकने व ऐटित चालणे, पाय आपटत चालणे. अशा प्रकारे आपला पोशाख, आपला साजशृंगार आणि अंगप्रदर्शन करुन परपुरुषांना आपल्याकडे आकृष्ट करणे हाच हेतु अशा स्त्रीचा यामागे कार्यरत राहातो. या संदर्भात कुरआनमध्ये 'अज्ञानकाळ' हा शब्द तीन ठिकाणी वापरात आला आहे.

१) अध्याय 'आले इमरान'मध्ये जिथे अल्लाहच्या मार्गात जीव वाचवून पळ काढणाऱ्यांसाठी स्पष्ट केले आहे की हे लोक अल्लाहच्या बाबतीत सत्याविरुद्ध अज्ञानकालीन शंकेत गुरफटले आहेत.

२) अध्याय 'मायदा'मध्ये जिथे अल्लाहच्या कायदेकानूशिवाय इतरांच्या कायद्यांप्रमाणे निकाल लावणाऱ्यांसाठी आणि निर्णय स्वीकारणाऱ्यांसाठी म्हटले गेले आहे, "काय अज्ञानकाळातील निर्णय त्यांना अपेक्षित आहे?"

३) अध्याय 'फतह'मध्ये सांगितले गेले आहे, मक्केतील अनेकेश्वरवादींनी शंकाकुशंकात पडून मुस्लिमांना काबागृहाची प्रदक्षिणा (उमरा) करु दिली नाही. त्या वेळी अज्ञानकाळ हा शब्दप्रयोग केला आहे.

एकदा अबू दरदा (रजि.) यांनी कुणालातरी आईवर शिवी दिली त्यावर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी त्यांना तंबी दिली, "तुम्ही अद्याप अज्ञानकाळातच वावरत आहात."

प्रेषितांनी आदेश दिला की तीन गोष्टी अज्ञानकाळाच्या द्योतक आहे. – (१) दुसऱ्यांना टोमणे मारणे व त्याची बदनामी करणे. (२) ग्रहताऱ्यांनुसार भविष्य पाहणे. (३) मेलेल्यांवर शोक प्रदर्शित करणे.

यावरुन हेच सिद्ध होते की अज्ञानकाळ म्हणजे इस्लामी संस्कृती, इस्लामी चारित्र्य, इस्लामी रीतीरिवाज, इस्लामी सभ्यता व नैतिकतेविरुद्धचे कृत्य. घोर अज्ञानकाळ म्हणजे इस्लामपूर्व काळातील कुप्रथा ज्यात समस्त जग फसलेले होते.

म्हणजेच अल्लाह श्रद्धावंत स्त्रियांना सजून धजून आपल्या घराबाहेर पडण्यापासून रोखत आहे. अल्लाह त्यांना त्यांच्या भल्यासाठी आदेश देतो की घरात टिकून राहा. कारण तुमचे जीवनध्येय घरात टिकून राहण्यातच साध्य आहे, घराबाहेर

पडून नव्हे. परंतु आवश्यकतेनुसार बाहेर पडावे लागले तर अज्ञानकाळातील स्त्रियांप्रमाणे नटूनथटून, अंगप्रदर्शन करत बाहेर पडू नका. हे एक श्रद्धावंत स्त्रीचे काम नाही, ही अज्ञानकाळातील कुप्रथा आहे त्यास इस्लाममध्ये स्थान नाही. आता या देशात जी सभ्यता आणि संस्कृती विशेषकरुन स्त्रियांसाठी प्रचारित केली जात आहे, काय ती कुरआन आणि इस्लामनुसार आहे? कुरआनोक्ती आहे,

"नबी (स) यांच्या पत्नीपासून जर तुम्हाला काही मागावयाचे असल्यास पडद्यामागून मागत जा, ही तुमच्या आणि त्यांच्या हृदयाच्या निर्मळतेसाठी अधिक उचित पद्धत आहे." (कुरआन-३३:५३)

हाच आदेश आहे ज्याला पडद्याचा (गोशा) आदेश म्हटले जाते. हा आदेश येण्यापूर्वी आदरणीय उमर (रजि.) यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना अनेकदा विनंती केली होती की आपल्या घरी चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारच्या लोकांची रीघ लागलेली असते. आपण आपल्या पत्नींना गोशा (पडदा करणे) बद्दल आदेश द्यावा. पुढे उमर (रजि.) यांनी स्पष्ट केले होते जर माझी विनंती मान्य केली तर माझी दृष्टी आपल्यावर कधीही पडू शकणार नाही. परंतु प्रेषित (स.) यांना कायदे बनविण्यासाठीचे स्वातंत्र्य नव्हते. म्हणून ते याबद्दल अल्लाहच्या आदेशाची वाट पाहत होते. शेवटी हा आदेश अल्लाहने अवतरित केला की "परपुरुषांना घरात येऊ देऊ नये आणि ज्या कुणाला मुस्लिम स्त्रीशी काम असेल त्याने पडद्याआडूनच बोलावे." या आदेशानुसार प्रेषितांच्या घराच्या दारावर पडदा लावण्यात आला आणि अनुयायांनीसुद्धा आपल्या घराच्या दारावर लगेचच पडदे लावले. कारण प्रेषितांचे घर त्यांच्यासाठी (मुस्लिमांसाठी) एक आदर्श घर होते. वरील कुरआनोक्तीद्वारा हेच सिद्ध होते की स्त्री आणि पुरुषांचे मन जर निर्मळ ठेवायचे असेल तर पडद्याच्या आदेशाला तंतोतंत अंमलात आणले गेले पाहिजे.

ज्याला अल्लाहने दृष्टी दिली आहे, त्याने स्वतः पाहून घ्यावे की हा आदेश परपुरुषांना स्त्रियांशी बोलताना पडद्यामागून बोलण्याचाच फक्त अधिकार देतो आणि ते पण यासाठी की स्त्री-पुरुषांची मने एकमेकांसाठी निर्मळ राहावीत. यावरुन हा अर्थ कसा निघतो की कॉलनीमध्ये, बाजारात, सरकारी नोकरीत, कार्यालयात, दवाखान्यात इ. ठिकाणी स्त्री-पुरुष खांद्याला खांदा लावून मिळून मिसळून राहावेत? आणि हेसुद्धा की असे केल्यामुळे मनाची निर्मळता आणि पवित्रता रोखली जाते? अज्ञानकाळातील हा विचार आज आपल्या समाजात व देशात फोफावत चालला आहे.

पुरुषांना नजरानजरी करण्यापासून मनाई

कुरआनमध्ये जिथे स्त्रियांना पडद्याचा (गोशा) आदेश दिला आहे तिथे पुरुषांना व स्त्रियांना दृष्टी (नजर) खाली ठेवण्यास आदेश दिला आहे. कुरआनोक्ती आहे,

''हे पैगम्बर (स) श्रद्धावंत पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टीची जपणूक करावी. आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे, ही त्यांच्यासाठी अधिक पवित्र पद्धत आहे जे काही ते करतात अल्लाह त्याची खबर राखणारा आहे.''

(कुरआन-२४:३०)

श्रद्धावंत पुरुषासाठी हे वैध नाही की त्याने आपल्या पत्नीशिवाय आणि मरहम स्त्रियांशिवाय इतर स्त्रियांकडे नजर भरुन पाहावे अथवा टक लावून असावे. एकदा अचानक नजर पडल्यास माफ आहे. परंतु हे माफ नाही की त्याने दुसऱ्यांदा परस्त्रीला टक लावून पाहावे. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी यास डोळ्यांचा व्यभिचार म्हटले आहे. प्रेषितांची शिकवण आहे,

''मनुष्य आपल्या प्रत्येक अवयवाने व्यभिचार व बलात्कार करतो. पाहात राहाणे डोळ्यांचा व्यभिचार, हाथ लावणे व अवैध कारणासाठी पुढे सरसावणे हातापायाचा व्यभिचार आहे. हे व्यभिचार पूर्ण झाले की नंतर मनुष्य आपल्या गुप्तांगाने बलात्कार करतो अथवा करत नाही.'' (बुखारी, मुस्लिम, अबू दाऊद)

एकदा प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आदरणीय अली (रजि.) यांना सांगितले, ''हे अली, एक नजरेनंतर दुसरी नजर टाकू नकोस. पहिली नजर तर माफ आहे परंतु दुसरी नजर माफ नाही.'' (अबू दाऊद)

''नजर ही सैतानाच्या विषारी बाणांपैकी एक बाण आहे. मला भिऊन जो त्याग करील मी त्याच्या मोबदल्यात त्याला अशी श्रद्धा बहाल करील ज्याने त्याला परम आत्मिक समाधान मिळेल.'' (तबरानी)

श्रद्धावंताची दृष्टी परस्त्रीच्या सौंदर्यावर जाते आणि तो त्वरीत दृष्टी हटवितो, तर अल्लाह त्याच्या उपासनापद्धतीत (नमाज,रोजा इ.) गोडी निर्माण करतो. शेवटच्या हजप्रसंगी प्रेषित मुहम्मद (स.) यांचे चुलतभाऊ फज़ल (रजि.) जे त्या वेळी तरुण होते, एकत्र प्रवास करत होते. रस्त्यातून स्त्रिया जात असताना फजल त्यांच्याकडे पाहू लागले. प्रेषितांनी त्यांच्या डोळ्यांवर हाथ ठेवला आणि त्यांचे तोंड दुसरीकडे वळविले.

(अबू दाऊद)

नजर खाली ठेवण्याचा म्हणजे आपल्या दृष्टीची जपणूक करण्याचा आदेश स्त्री आणि पुरुष दोघांसाठी आहे. वरील आयतीनंतर लगेचच तसाच आदेश स्त्रियांसाठीसुद्धा आला आहे. मुस्लिम समाजात पडद्याचा आदेश आल्याबरोबर जी पडद्याची व्यवस्था सुरु झाली त्यात चेहरा लपविण्याचा (गोशा) समावेश होता.

आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे विवेचन आहे,

''जंगलातून परत आल्यानंतर मी पाहिले की काफिला निघून गेला आहे तर मी बसून राहिले. झोपेची झापड अशी लागली की मी तिथेच झोपून गेले. सकाळी सुफयान बिन मुअतल तिथे आला. तो मला पाहून लगेचच ओळखून बसला कारण पडद्याच्या आदेशापूर्वी त्याने मला पाहिले होते. तो कुरआनची आयत (इन्ना लिल्लाही...) म्हणू लागला. त्याच्या आवाजाने मी जागी झाले आणि मी आपल्या चादरीने माझा चेहरा झाकून घेतला.'' (बुखारी, मुस्लिम)

'किताबुल जिहाद'मधील एक घटना आहे. एक स्त्री उम्मे खलाद नावाची, आपला मुलगा एका लढाईत शहीद झाल्यावर प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याकडे आली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर पडदा झाकलेला होता.

ते पाहून काही सहाबांनी (साथीदार) आश्चर्य व्यक्त केले आणि विचारले, ''या स्थितीतसुद्धा की जेव्हा मनुष्याला आपल्या अंगाची व आपल्या कपड्यांची पर्वा नसते; तू गोशामध्ये आली आहेस?''

तिने उत्तर दिले, ''मी माझा मुलगा गमावला आहे इज्जत आबरू नव्हे.''

लग्नासाठी मुलगी ठरवायची असेल तर तिला पाहणे व पाहत राहणे योग्य आहे. तशी परवानगी देण्यात आली आहे. अशा प्रकारे गुन्ह्याच्या शोधात त्या स्त्रीला पाहणे, साक्षीदार स्त्रीला कोर्टात पाहणे, तसेच रोगाचे निदान करण्यासाठी स्त्रीला पाहणे इत्यादी मान्य करण्यात आले आहे. स्त्रियांनासुध्दा परपुरुषांना टक लावून पाहणे अवैध आहे.

एकदा आदरणीय सलमा आणि मैमूना (रजि.) ज्या आमच्या आदरणीय माता आहेत, एकत्र बसल्या होत्या. तेवढ्यात मकतूम (रजि.) तिथे आले ते आंधळे होते. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी दोघींना त्यांच्याशी पडदा करण्यास सांगितले.

तेव्हा त्या दोघींनी आश्चर्य व्यक्त केले, ''ते तर आंधळे आहेत. ते आम्हासा कसे पाहणार?''

त्यावर प्रेषितांनी सांगितले, ''काय तुम्ही दोघेही आंधळे आहात की तुम्ही त्यांना पाहू शकत नाही?''

या वेळी पडद्याचा आदेश आला होता.

इतर संदर्भानुसार, स्त्रीने पुरुषाला पाहण्यासाठी इतकी मनाईची ताकीद आलेली नाही जितकी मनाईची सक्ती पुरुषाने स्त्रीला पाहण्यासाठी आहे. सभेत समोरासमोर बसून एकमेकांना पाहणे निषिध्द आहे. रस्त्यात चालताना एक-दुसऱ्यावर नजर पडली तर त्यात गैर काही नाही. स्त्रीला आपला चेहरा पडद्याने झाकून घेण्याचा आदेश याचसाठी आहे की पुरुषाने स्त्रीला पाहू नये. परंतु पुरुषाला नकाब (चेहरा झाकणे) चा आदेश नाही की त्याला स्त्रीने पाहू नये. यावरून हेच सिध्द होते स्त्री आणि पुरुषांना या बाबतीत वेगवेगळे नियम लागू आहेत. याचा हा अर्थ होत नाही की स्त्रीने पुरुषाला एकसारखे टक लावून पाहत राहावे.

स्त्रियांसाठी दृष्टीची जपणूक

अल्लाहने अध्याय 'नूर'मध्ये आदेश दिला आहे,

''हे पैगम्बर (स.) श्रध्दावंत स्त्रियांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टींची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. आणि आपला साजशृंगार दर्शवू नये, त्याव्यतिरिक्त जे सहजासहजी प्रकट होईल आणि आपल्या छातीवर आपल्या ओढणीचा पदर घालून ठेवावा. त्यांनी आपला साजशृंगार प्रकट करू नये परंतु या लोकांसमोर पती, पिता, पतीचे वडील, आपली मुले, पतीची मुले, भाऊ भावांची मुले, बहिणीची मुले, आपल्या मेलमिलाफाच्या स्त्रिया आपल्या दासी, गुलाम, ते हाताखालचे पुरुष जे एखादा अन्य प्रकारचा हेतु बाळगत नसतील आणि ती मुले जी स्त्रियांच्या गुप्त गोष्टींशी अद्याप परिचित झाली नसतील. त्यांनी आपले पाय जमिनीवर आपटत चालू नये की जेणेकरून त्यांनी जो आपला शृंगार लपविलेला आहे त्याचे ज्ञान लोकांना होईल. हे श्रध्दावंतांनो, तुम्ही सर्वजण मिळून अल्लाहजवळ पश्चात्ताप व्यक्त करा, अपेक्षा आहे की सफल व्हाल.'' (कुरआन-२४:३१)

येथे अल्लाह श्रध्दावंत स्त्रियांना आपल्या दृष्टीची जपणूक करण्याचा आदेश देत आहे. स्त्रियांनी परपुरुषांकडे पाहणे निषिद्ध आहे. पुरुषांसाठी स्त्रियांचे गुप्तांग (सतर) हे पूर्ण शरीर, चेहरा आणि हाथ आहेत, ज्यास पतीशिवाय अन्य कोणापुढे उघडे केले जाऊ नये, मग बाप अथवा भाऊ समोरसुध्दा नाही. याविषयी पुरुषांनासुध्दा तसाच आदेश आहे परंतु सीमा मात्र वेगवेगळ्या आहेत. आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे विवेचन आहे की त्यांची बहीण असमा प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यासमोर अत्यंत पातळ, कपडे परिधान करून आली. प्रेषितांनी त्वरित आपले तोंड विरुध्द दिशेला फिरविले आणि सांगितले, असमा स्त्री जेव्हा वयात आली तर तिला तिचा चेहरा, हाथसुध्दा इतरांसमोर उघडा करणे निषिद्ध आहे. हे घराचे काम करताना आपल्या वडील व भावासमोर आवश्यकतेनुसार हाथाचा व तोंडाचा काही भाग ती उघडा करू शकते. स्त्रीला आपले सौंदर्य दुसऱ्यासमोर उघडे करणे निषिद्ध आहे आणि आपल्या अब्रूचे त्याद्वारे रक्षण करावे. आपले सौंदर्य उघडे न करण्यात स्त्रीचे स्त्रीशील आहे. कानाचे दागिने (बाळी), गळ्यातील हार आणि पायातील दागिने (पैंजण) दुसऱ्यांना उघड करून तिने दाखवू नये. सौंदर्य (जिनत) दोन प्रकारचे आहे. एक तो साजशृंगार ज्यास पती पाहू शकतो आणि दुसरा साजशृंगार (जिनत) ज्यास परपुरुषसुध्दा पाहू शकतो. चेहरा आणि हाथ स्त्रीच्या सतर (गुप्तांग) मध्ये सामील नाही. सतर आणि हिजाब

(पडदा) मध्ये मोठे अंतर आहे. सतर तर ते आहे ज्यास परपुरुषासमोर उघडणे स्त्रीला निषिध्द आहे, परंतु पडदा (हिजाब) हे स्त्री आणि परपुरुषादरम्यान एक आणखी आडपडदा आहे. अज्ञानकाळात गळा व छाती उघडी ठेवत. एक कुडता (स्कर्ट) फक्त अंगावर असे. परंतु कुरआनचा आदेश आल्यावर त्वरित प्रत्येक मुस्लिम स्त्रीच्या अंगाखांद्यावर चादर (दुपट्टा) दिसू लागली. त्याचा हेतु आजच्यासारखा गळ्यात लटकवण्याच्या नव्हता तर त्या दुपट्ट्याला परिधान करून डोके, कंबर आणि छाती पूर्णत: झाकली जावी. श्रध्दावंत स्त्रियांनी कुरआनचा हा आदेश ऐकताक्षणी त्याचे काटेकोर पालन केले, त्याबद्दल आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे विवेचन आहे, "जेव्हा 'सूरे नूर' अवतरित झाला तेव्हा त्यास ऐकूण लोक लगेचच आपआपल्या घरांकडे परतले आणि घरात आपल्या पत्नी, बहिणी, पुत्रींना, बहुबेटींना हा आदेश ऐकविला. आदेश ऐकताक्षणी श्रध्दावंत स्त्रिया जागीच बसून राहिल्या नाहीत तर त्या उठल्या आणि घरातील चादरींचा वापर दुपट्टा म्हणून करू लागल्या. दुसऱ्या दिवशी जितक्या स्त्रिया मस्जिदे नबवीमध्ये सकाळच्या नमाजसाठी हजर झाल्या त्या सर्व दुपट्टे ओढलेल्या होत्या."

ज्या लोकांसमोर स्त्री आपला साजशृंगार जाहीर करू शकते त्याचा तपशीलसुध्दा वरील कुरआनोक्तीत आला आहे. ती आपल्या साजशृंगारासह वावरू शकते ते हेच कार्यक्षेत्र आहे. या क्षेत्राबाहेर तिला आपला साजशृंगार दाखवत फिरणे अवैध आहे. माता आयेशा (रजि.) यांचे विवेचन आहे की एकदा अबूल कअस यांचे बंधु अफलअ त्यांच्याकडे आले आणि आत येण्याची परवानगी मागितली. परद्याचा आदेश लागू होता. त्यांनी अफलअला आत येण्याची परवानगी दिली. त्यांनी आत निरोप पाठविला, "तू (आयशा) माझी तर भाची आहे कारण माझ्या भावाच्या पत्नीचे तू दूध प्यालीस." परंतु आयशा (रजि.) यांना याबाबत शंका होती की या नातेसंबंधात पडदा करावा की नाही. तेवढ्यात प्रेषित मुहम्मद (स.) तिथे आले आणि आदेश दिला, "ती तुमच्या जवळ येऊ शकते."

यावरून हेच ज्ञात होते की खुद्द प्रेषित मुहम्मद (स.) यांनी वरील आयतीला (दिव्य प्रकटन) त्यात जेवढ्या नातेवाईकांची नावे आली आहेत त्यांच्याशी पडदा नसावा व इतर सर्वांशी पडदा करावा. त्यातून प्रेषितांनी हा अर्थ काढला की एका स्त्रीला ज्यांच्याज्यांच्याशी लग्न करणे निषिद्ध आहे, ते सर्व या आयतीच्या आदेशात सामील आहेत. म्हणजे चुलते, मामा, जावई इ. अस्मा बिन्ते अबु बकर या प्रेषित मुहम्मद

(स.) यांच्या मेव्हणी होत्या. त्या प्रेषितांसमोर चेहरा आणि हात उघडे ठेवत असत. जिथे नातेसंबंधाबाबत शंका आहे तिथे परदा करणे योग्य आहे.

मेलमिलाफ करणाऱ्या स्त्रियांसमोर साजशृंगार जाहीर केला जाऊ शकतो, मग त्या मुस्लिम असोत अथवा अमुस्लिम. परंतु अनोळखी स्त्रीसमोर साजशृंगार दर्शवू नये. चारित्र्य, सुसंस्कृत घराण्याच्या स्त्रिया, मग त्यांचा धर्म कोणताही असो, त्या भरवसा करण्यालायक आहेत तर त्यांच्याशी परदा केला नाही तरी चालतो. परंतु बेशरम, चारित्र्यहीन आणि बेभरवशाच्या स्त्रियांसमोर परदा करणे आवश्यक आहे. कारण त्या चारित्र्यहीन असल्याने त्या परपुरुषासमानच आहेत. इस्लाममध्ये ज्यांच्यासमोर साजशृंगार दर्शविण्याची परवानगी दिली आहे, त्यात दासींचासुध्दा समावेश आहे. परपुरुषासमोर एक स्त्री खालील स्थितीत साजशृंगार दर्शवु शकते. (१) तो परपुरुष ताबेदार असावा. (२) तो परपुरुष काही इच्छा ठेवणारा नसावा, म्हातारा, वेडा इ.

मदीनामध्ये एक नपुसक राहात होता. ज्याला प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या घरात ये-जा करायला परवानगी होती. एकदा प्रेषित आदरणीय माता उम्मे सलमा (रजि.) यांच्या घरी गेले, तेथे हा उम्मे सलमाच्या बंधुशी बोलताना प्रेषितांनी ऐकले. तो सांगत होता, "उद्या जर ताईफ आपण जिंकलो तर जिलनीची मुलगी बादियाला प्राप्त केल्याशिवाय राहू नकोस." नंतर त्याने बादियाचे सौंदर्य आणि गुप्तांगाचेसुध्दा वर्णन केले. त्यावर प्रेषितांनी आदेश दिला, "हे ईश्वराचे दुश्मन! तू आपल्या दृष्टीची जपणूक करू शकला नाही." आणि त्याला घरात न येण्याची तंबी दिली. त्याला नपुसक समजून स्त्रिया त्याच्याशी पडदा करत नव्हत्या. तो एका घराची वार्ता दुसऱ्या घरी सांगत होता. म्हणून शारीरिकरित्या अक्षम असून चालत नाही तर असा मनुष्य मनोकामना विरहित असणे आवश्यक आहे अन्यथा अशा माणसाद्वारे अनेक उपद्रव घडू शकतात. जी मुले अद्याप बाल्यावस्थेत आहेत त्यांच्यासमोर पडदा नाही केला तरी चालतो. बारा वर्षांपर्यंतच्या मुलांना हे लागू आहे. स्त्रिया सुगंध लावून बाहेर पडू शकत नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण आहे, "अल्लाहच्या दासींना अल्लाहच्या मस्जिदमध्ये प्रवेश नाकारू नका, परंतु त्यांनी सुगंध लावून मस्जिदीत येऊ नये."

एक स्त्री मस्जिदमधून बाहेर पडताना माननीय अबु हुरेरा (रजि.) तिच्या जवळून गेले. त्यांना जाणीव झाली की त्या स्त्रीने सुगंध लावला आहे. त्यांनी त्या स्त्रीला टोकले. तिने सुगंध लावल्याचे कबूल केले. त्यावर ते म्हणाले, "मी प्रेषित मुहदम्म (स.) यांना सांगताना ऐकले आहे की स्त्री सुगंध लावून मस्जिदमध्ये आली तर तिची नमाज तोपर्यंत

कबूल होत नाही जोपर्यंत ती घरी जाऊन स्नान करत नाही.'' (अबू दाऊद)

तसेच विनाकारण स्त्रियांनी आपला आवाज परपुरुषांना ऐकवू नये. आवश्यकता भासल्यास परपुरुषाशी बोलण्यास खुद्द कुरआनने परवानगी दिली आहे. आदरणीय माता लोकांना धार्मिक प्रश्नांची उत्तरे देत असत, परंतु जिथे धार्मिक व नैतिक फायदा नाही तिथे परपुरुषांना स्त्रीने आपला आवाज ऐकविणे अवैध आहे.

पडद्याचे हे आदेश अल्लाहने दिलेले आदेश आहेत. अल्लाहचे श्रध्दावंत दास आपल्या कमजोरीपासून अल्लाहची सतत माफी मागतात. ते भविष्यात सुधारणा करण्याची अभिलाषा बाळगतात आणि पडद्याच्या या ईशआदेशानुसार चालण्यासाठी प्रयत्नशील राहातात.

इस्लामी समाजातील सुधारणा

या ठिकाणी समाजातील इतर सुधारणांचासुध्दा खुलासा व्हावा, ज्यांना प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अल्लाहने दिलेल्या पडद्यास बंदीच्या अनुषंगाने समाजात घडवून आणल्या आहेत. ते खालीलप्रमाणे–

(१) प्रेषित मुहम्मद (स.) यांनी श्रध्दावंत स्त्रीला परपुरुषासंगत एकांतात बसून बोलण्यास, मग ते नातेवाईक का असोत, सक्त मनाई केली आहे. प्रेषितांचा आदेश आहे, "ज्या स्त्रियांचे पती बाहेर गेले आहेत अशा स्त्रियांजवळ जाऊ नका, कारण सैतान तुमच्या प्रत्येकामध्ये रक्तासारखा भिणलेला आहे." (तिरमिजी)

"जो कोणी अल्लाह आणि परलोकवर श्रध्दा ठेवतो त्याने कधी परस्त्रीशी एकांतात भेटू नये, जोपर्यंत कोणी महरम व्यक्ती (संबंधित) तिच्याबरोबर नसेल, कारण तिसरा तिथे सैतान असतो."

या बाबतीत प्रेषित मुहम्मद (स.) यांची ही वागणूक होती की एका रात्री ते सफिया (र.) च्या घराकडे चालले होते. सफिया (र.) त्यांच्याबरोबर होत्या. रात्री त्या वेळी दोन व्यक्ती त्यांच्या जवळून गेल्या. त्यांना रोखून प्रेषित म्हणाले, "माझी पत्नी सफिया माझ्याबरोबर आहे." त्यांनी उत्तरात म्हटले, "हे प्रेषित! आपल्या बाबतीत कुणाचा गैरसमज होऊ शकतो बरे!" प्रेषितांनी सांगितले, "सैतान माणसांमध्ये रक्तासारखा भिणलेला आहे. मला वाटले तो तुमच्या मनात काही दुष्प्रवृत्तींना उफाळू नये." (अबू दाऊद)

(२) प्रेषित मुहम्मद (स.) यांनी 'परपुरुषाचा स्पर्श श्रध्दावंत स्त्रीला कदापिही होऊ देता कामा नये' हा आदेश दिला. ते पुरुषांशी शपथ- वचननामा (दीक्षा) हातावर हात देऊन करत, परंतु स्त्रियांच्या बाबतीत असे नव्हते. आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे निवेदन आहे की प्रेषितांचा हात कधीही पर स्त्रिला लागला नाही. स्त्रियांशी ते तोंडी वचन घेत असत आणि जेव्हा वचन पूर्ण होई तेव्हा प्रेषित उपदेश देत असत, "जा, तुमची दीक्षा पार पडली." (अबू दाऊद)

(३) प्रेषित मुहम्मद (स.) यांनी श्रध्दावंत स्त्रीला एकटी अथवा संबंधित पुरुषाविना प्रवास करण्यास सक्त मनाई केली आहे. प्रेषितांचा आदेश आहे,

"कोणी पुरुषाने परस्त्रीशी एकांतात भेटू नये, जोपर्यंत तिथे तिचा संबंधित पुरुष उपस्थित नसेल आणि श्रध्दावंत स्त्रीने एकटी तसेच आपल्या संबंधित पुरुषाविना प्रवास

करता कामा नये.'' (बुखारी)

एकदा एका व्यक्तीने प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले , ''माझी पत्नी हजसाठी जात आहे, परंतु माझे नाव मात्र अमुक मोहिमेसाठी निश्चित करण्यात आले आहे?'' त्यावर प्रेषितांनी आदेश दिला, ''तुम्ही आपल्या पत्नीबरोबर हजला जावे.''

यावरून हेच सिध्द होते की एक श्रध्दावंत (मुस्लिम) स्त्रीला संबंधित व्यक्तीविना प्रवास करणे निषिद्ध आहे.

(४) प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्त्री-पुरुषांच्या मेलमिलाफाचा कडाडून विरोध केला. शुक्रवारची प्रार्थना सामुदायिकपणे अदा करणे अल्लाहने अनिवार्य ठरविले आहे. सक्षम कारणाशिवाय जर एखादी व्यक्ती शुक्रवारच्या नमाजसाठी मस्जिदमध्ये न जाता घरातच नमाज पढत असेल तर त्याची ती नमाज मान्य होत नाही. परंतु स्त्रियांना शुक्रवारच्या सामुदायिक नमाजपासून सूट देण्यात आली आहे आणि पुढे स्पष्ट केले की स्त्रियांसाठी मस्जिदपेक्षा घरातील नमाज श्रेष्ठ आहे. तरीपण प्रेषितांनी याउपर स्त्रियांना मस्जिदप्रवेश अमान्य केलेला नाही. प्रेषितांची शिकवण आहे, ''अल्लाहच्या दासींना अल्लाहच्या मस्जिदमध्ये येण्यापासून रोखू नका.'' (अबू दाऊद)

एकदा प्रेषित मुहम्मद (स.) यांना एका स्त्रीने (सादिया) विचारले, ''मला आपल्या मागे नमाज अदा करावयाची खूप इच्छा आहे.'' त्यावर प्रेषित म्हणाले, ''तुम्ही आपल्या खोलीत नमाज अदा करणे हे व्हरांड्यात नमाज अदा करण्यापेक्षा उत्तम आहे आणि आपल्या घरात नमाज अदा करणे हे आपल्या मुहल्यातील मस्जिदमध्ये नमाज अदा करण्यापेक्षा अधिक चांगले आहे.'' आदरणीय माता आयेशा (रजि.) यांनी नमूद केले आहे, ''आजच्या स्त्रियांचे रंगढंग जर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी पाहिले असते तर स्त्रियांचे मस्जिदमध्ये येणे कायमचेच बंद केले असते. जसे बनी इस्राइलच्या स्त्रियांना प्रवेशबंदी होती.'' (बुखारी, मुस्लिम)

मस्जिदे नबवीमध्ये स्त्रियांना येण्या-जाण्यासाठी प्रेषित मुहम्मद (स.) यांनी एक द्वार विशिष्ट करून ठेवले होते आणि आदरणीय उमर (र.) त्यांच्या काळात पुरुषांना त्या द्वाराचा उपयोग येण्या-जाण्यासाठी करू देत नसत. नमाजमध्ये स्त्रिया मागच्या ओळीत उभे राहत असत. प्रेषित सलामनंतर थांबत, आधी स्त्रिया बाहेर पडत असत व नंतर पुरुष.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा आदेश आहे, ''उत्तम पुरुषांची जमात प्रथम ओळीतील आणि निकृष्ठ जमात अगदी मागची म्हणजे स्त्रियांजवळची आहे. उत्तम

स्त्रियांची अगदी शेवटची आणि निकृष्ठ स्त्रियांची प्रथम म्हणजे पुरुषांजवळची.''

(मुस्लिम)

ईदच्या नमाजमध्ये स्त्रिया सामील होत असत, परंतु त्यांची स्वतंत्र वेगळी व्यवस्था होती आणि प्रेषित मुहम्मद (स.) स्त्रियांना वेगळा खुतबा (प्रवचन) नंतर देत असत. एकदा प्रेषित मुहम्मद (स.) यांनी पाहिले की मस्जिदच्या बाहेर स्त्री-पुरुष गर्दीमुळे एकत्र झाले आहेत. त्यावर प्रेषितांनी आदेश दिला, ''स्त्रियांसाठी सडकेच्या मधोमध चालणे उचित नाही. त्यांनी सडकेच्या कडेने चालावे.'' हा आदेश मिळताचा स्त्रियांनी त्याचे पालन सुरु केले.

इस्लाम अशा प्रकारे स्त्री आणि पुरुषांच्या मेलमिलाफाच्या सक्त विरोधात आहे. जो धर्म धार्मिक स्थळातसुध्दा दोघांची सरमिसळ होऊ देत नाही तो कार्यालयात, कॉलेजात, क्लबात आणि उत्सवात स्त्री-पुरुषांचे एकत्र येणे कसे पसंत करील? इस्लाम सहशिक्षण व खांद्याला खांदा लावून स्त्री-पुरुषाने वागण्याच्या सक्त विरोधात आहे.

(५) स्त्रियांना सीमेत राहून साजशृंगार करण्याची परवानगी आहे. अज्ञानकाळात अरब स्त्रियांत जे बनाव शृंगाराचे प्रकार प्रचलित होते त्यास धिक्कारले गेले आहे. १) शरीराच्या काही भागांना गोंदणे, २) केस विचित्र बनविणे, ३) दातांना घासून घासून बारीक बनविणे, ४) चेहऱ्याला विद्रुप करणे, इ.

अल्लाह आणि त्याचे प्रेषित मुहम्मद (स.) यांचे स्पष्ट आदेश पाहता श्रध्दावंतासाठी दोनच मार्ग उरतात. एक तर हे आदेश मान्य करून ते आचरणात आणावे आणि आपल्या कुटुंबाला, आपल्या घराला व आपल्या समाजाला अनैतिकतेच्या गोष्टींपासून दूर ठेवावे. दुसरे जर या आदेशांचे पालन होत नसेल तर त्यास त्याने गुन्हा समजावा, पुण्य समजू नये. जे पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करून समजून बसतात आणि प्रसार करतात की इस्लाममध्ये पडदा नाही, ते गुन्हा तर करतात पण अज्ञानकाळाची व दांभिकतेची सीमा ओलांडतात. त्यांची कदर या जगात आणि परलोकातही होत नाही. परंतु मुस्लिम दांभिक लोकांपेक्षा पुढे जाऊन अल्लाह आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या या आदेशांना चुकीचे मानतात. ज्या अमुस्लिम चालीरीतींना त्यांनी अंगीकारले आहे त्यांना सत्य समजात. हे खरे पाहता मुस्लिम नाहीत, कारण यानंतरही जर ते मुस्लिम राहीले तर इस्लाम आणि ईशद्रोही यात काहीच फरक राहात नाही. मानवतेच्या इतक्या नीच व खालच्या पातळीचे लोक दुसरे असू शकत नाही. अध्याय 'अहजाब'मध्ये अल्लाहचा आदेश आहे,

"हे नबी (स.) आपल्या पत्नी, मुली आणि श्रध्दावंतांच्या स्त्रियांना सांगा की आपल्या चादरीचे पदर लोंबते ठेवत जा. ही अधिक योग्य पध्दत होय, जेणेकरून त्या ओळखल्या जाव्यात आणि त्रास दिला जाऊ नये. सर्वश्रेष्ठ अल्लाह क्षमाशील व परम कृपाळू आहे." (कुरआन-३३:५९)

कुलीन व सुसंस्कृत स्त्रियांची हीच ओळख आहे की त्या आपला साजशृंगार लपवून (बुरखा-पडदा करून) घराबाहेर पडतात. याचसाठी श्रध्दावंत स्त्रीला आदेश दिला आहे की तिने आपली चादर आपल्या चेहऱ्यावरसुध्दा टाकून घ्यावी व चेहरा झाकावा. या साध्या व इज्जतदार आहेत आणि त्या काही बदचलन व टपोरी स्त्रिया नाहीत की ज्यांच्याकडून परपुरुषांनी आपल्या मनोकामना पूर्ण करून घेण्याची आशा बाळगावी. हे जाणून घेऊन कोणीही त्यांच्या वाटेला जात नाही की त्यांना छेडत नाही.

या ठिकाणी जरा थांबून हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा की कुरआनचा हा आदेश आणि त्याचा उद्देश अल्लाहने स्पष्ट सांगितला आहे जो इस्लामी समाजाच्या आत्म्याला स्पष्ट करतो. या अगोदर अध्याय नूरच्या आयत नं ३१ मध्ये तपशीलवार सांगण्यात आले की स्त्रियांनी आपले साजशृंगार कोणकोणत्या पुरुषासमोर प्रदर्शित करू नये आणि जमिनीवर चालताना पाय आपटून चालू नये की परपुरुषांना त्यापासून साजशृंगाराचे ज्ञान व्हावे जे त्यांनी लपवून ठेवलेले आहे. या आदेशाला अध्याय अहजाबच्या या आदेशाला जोडून पाहिले तर अगदी स्पष्ट होते की येथे चादर ओढण्याचा आदेश आला आहे. त्याचा उद्देश परपरुषांपासून आपले साजशृंगार लपविणे हाच आहे. चादर मात्र साधी व जाडी भरडी असावी किंवा इतकी तंग नसावी की शरीराचे अवयवांचे उभार स्पष्ट दिसून येईल, अशाने तर उद्देश सफल होणार नाही.

येथे एक आदेश हासुध्दा आहे की स्त्रियांनी चादरीचा एक पदर आपल्या शरीरावर लटकवावा. या आदेशाचा उद्देश स्पष्ट करताना अल्लाहने सांगितले आहे की असे करण्यामुळे या स्त्रिया श्रध्दावंत स्त्रिया आहेत हे ओळखले जाईल आणि त्यांना त्रास दिला जाणार नाही. यावरून हे स्पष्ट होते की हा आदेश त्या स्त्रियांना दिला जात आहे ज्या पुरुषांच्या छेडछाडीपासून व नजरबाजी तसेच त्यांच्या वाईट मनोकामनांपासून अलिप्त राहू इच्छितात. कारण हे सर्व त्यांच्यासाठी असह्य आणि अत्यंत कष्टदायक आहे.

या श्रध्दावंत स्त्रिया पार्ट्यांची, क्लबांची, दूरदर्शन व आकाशवाणीची शोभा वाढवण्यासाठी मुळीच नाहीत. अशा सभ्य आणि सदाचारी स्त्रीला कुरआन आदेश

देतो की तुला हे शोभा देत नाही की तू खूप साजशृंगार करून, नटूनथटून पहिल्या रात्रीच्या नवरीसारखी घराबाहेर पडावी. ही योग्य पध्दत नाही की पाहणाऱ्यांच्या दुष्ट नजरा तुझ्या सौंदर्यावर टिकून राहाव्यात. म्हणून हे श्रध्दावंत स्त्री, तू आपला सारा साजशृंगार चादरीखाली लपवून (बुरखा परिधान करून) बाहेर पड आणि आपल्या चेहऱ्याला झाकून घे व चालताना जमिनीवर पाय आपटू नकोस जेणेकरून लोकांनी तुझ्याकडे आकृष्ट व्हावे.

जेव्हा स्त्री लोकांसमोर त्यांना नजरसुख देण्यासाठी येते तेव्हा उद्देश स्पष्ट होतो. दुराचारी लोकांना हेच अपेक्षित आहे. कुरआन स्त्रियांना बाजारू बनऊ इच्छित नाही. अशा सर्व चालीरीती आणि पध्दतींना इस्लाम फाटा देण्यास बजावतो ज्या स्त्रियांना बाजाराची शोभा बनवितात. अज्ञानामुळे जे अपराध हातून घडले आहेत, अल्लाह आपल्या कृपेने त्यांना माफ करील. परंतु आता स्पष्ट आदेश प्राप्त झाल्यानंतर आपल्या वागणुकीत सुधारणा करा आणि अज्ञानकाळातील रुढी-परंपरांवर कायम राहू नका. स्त्रीला परपुरुषाशी विनाकरण बोलण्यापासून परावृत्त झाले पाहिजे. कुरआनोक्ती आहे,

"नबी (स.) यांच्या पत्नींनो! तुम्ही सामान्य स्त्रियांप्रमाणे नाहीत, जर तुम्ही अल्लाहचे भय बाळगणाऱ्या असाल तर हळू आवाजात बोलत जाऊ नका की विकृत हृदयाचा एखादा माणूस लालसेत पडेल. तर स्पष्ट सरळ बोलणे बोला."

(कुरआन-३३:३२)

आवश्यकतेनुसार परपुरुषांशी बोलण्यास मनाई नाही. परंतु अशा वेळी स्त्रीची बोलण्याची पध्दत व आवाज असा पाहिजे की समोरच्या पुरुषाच्या मनात त्या स्त्रीबद्दल काही वाईट विचारसुध्दा येऊ नये. त्या स्त्रीच्या बोलण्यात लचक असू नये, मधुरता आणि आपलेपण असू नये, ज्याला ऐकून समोरचा पुरुष भावनाविभोर होईल आणि पुढचे पाऊल टाकण्यास प्रवृत्त होईल. अशा वाईट पध्दतीच्या बोलण्याबद्दल अल्लाहचा आदेश आहे की असे लचकदार बोलणे त्या स्त्रीला शोभत नाही जिच्या मनात अल्लाहच्या कोपाचे भय आहे आणि जी दुराचारापासून दूर राहू इच्छिते.

आता विचार करण्याची गोष्ट आहे की जी जीवनशैली (इस्लाम) पुरुषांशी बोलताना लचकदार बोलण्यापासून स्त्रियांना मनाई करते ती याला पसंत करील काय की स्त्रीने स्टेजवर येऊन गाणे गावे, नाचावे, थिरकावे, खेळ, सिनेमात भाग घ्यावा तसेच हवाई सुंदरी बनून प्रवाशांचे मनोरंजन करत जावे. बाजारात नटूनथटून जावे?

स्त्रीचे आर्थिक हक्क

मनुष्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याची समाजमर्यादा आणि समाजातील प्रतिष्ठा आहे. आपल्या सामाजिक प्रतिष्ठेवर त्याची प्रतिष्ठा अवलंबून असते. इस्लामने स्त्रीला या दृष्टिकोनातून मजबूत आधार दिला आहे. कुरआनोक्ती आहे,

''पुरुष स्त्रियांवर विश्वस्त आहेत. या आधारावर की अल्लाहने त्यांच्यापैकी एकाला दुसऱ्यावर श्रेष्ठत्व दिले आहे आणि या आधारावर की पुरुष आपली संपत्ती खर्च करतात.'' (कुरआन-४:३४)

पुरुषांना स्त्रियांचे विश्वस्त म्हटले आहे कारण ते वैयक्तिक आणि सामाजिकदृष्ट्या परिस्थिती व्यवस्थितरित्या निभावून नेण्यास सक्षम आहेत. ते संरक्षक आणि पालकाची भूमिकासुध्दा चांगल्या प्रकारे पार पाडतात. त्यांना (पुरुषांना) सामाजिक जबाबदाऱ्यांसाठी उत्तरदायी धरण्यात आले आहे, तसेच आर्थिक बोझा त्यांच्यावर टाकण्यात आला आहे. पुरुष स्त्रियांचे रक्षणकर्ते, देखभाल करणारे व पालनपोषण करणारे आहेत. सर्व प्रकारची आर्थिक जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली आहे. म्हणून त्यांना प्राधान्य देण्यात आले आहे. येथे प्राधान्य इज्जतीत अथवा श्रेष्ठत्वात देण्यात आलेले नाही तर फक्त या दृष्टीने की अल्लाहने पुरुषांना काही विशेष वैशिष्ट्य आणि शक्ती दिलेल्या आहेत, ज्या दुसऱ्यांना (स्त्रियांना) दिलेल्या नाही. पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये ही वैशिष्ट्ये आणि शक्ती कमी प्रमाणात बहाल करण्यात आल्या आहेत. याच कारणामुळे पुरुषाला स्त्रियांचा विश्वस्त म्हणून कुटुंबात प्राधान्य देण्यात आले आहे. याची योग्यता पुरुषामध्ये अल्लाहने ठेवली आहे. स्त्रियांना नैसर्गिकरित्या अल्लाहने निर्माण केले आहे की कौटुंबिक व्यवस्थेत पुरुषांच्या संरक्षणात आणि देखरेखीखाली राहिले पाहिजे.

योग्य वारसा (स्त्री वारसा)

स्त्रीला आपले वडील, पती, मुलबाळ आणि दुसऱ्या नजिकच्या नातेवाईकांकडून वारसाहक्क मिळतो. अल्लाहचा आदेश आहे,

''पुरुषासाठी त्या संपत्तीत हिस्सा (वाटा) आहे जी आईवडील आणि नातेवाईकांनी सोडली आहे. आणि स्त्रियांसाठीसुध्दा त्या संपत्तीत वाटा आहे जी आईवडील आणि नातेवाईकांनी सोडली आहे. थोडा असो की जास्त आणि हा वाटा अल्लाहकडून मुकर्रर केला गेला आहे.'' (कुरआन)

वरील कुरआनोक्तीत पाच कायदेशीर आदेश आलेले आहेत.

१) वारसाहक्क फक्त पुरुषांसाठी नाही तर स्त्रियासुध्दा त्यात हकदार आहेत.

२) वारसासंपत्ती कोणत्याही स्थितीत वाटली जाणे आवश्यक आहे. मग ती कितीही कमी असो.

३) यावरून हेसुध्दा सिध्द होते की वारसाहक्क प्रत्येक प्रकारच्या धनसंपत्तीला लागू होतो.

४) वारसाहक्क तेव्हाच निर्माण होतो जेव्हा मृत व्यक्ती काही संपत्ती मागे सोडून जाते.

५) जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत दूरच्या नातेवाईकाला वारसाहक्क प्राप्त होत नाही.

स्त्रीला वेगवेगळ्या मार्गाने जी धनसंपत्ती मिळते त्याचा मालकीहक्क फक्त तिच्याकडेच जातो. ज्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार पतीला आणि पित्यालासुध्दा नाही आणि दुसऱ्या कुणालाही तसा अधिकार नाही. कुरआननुसार वारसाहक्काचा कायदा खालील तत्त्वानुसार आहे. ''एका पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांच्या वाट्याबरोबर आहे.'' यावर दोन प्रकारे आचरण होईल.

१) वारसदार मृत व्यक्तीच्या अगदी जवळचा म्हणजे पती-पत्नी असेल.

२) वारसदार हा मृत व्यक्तीच्या जवळचा नातेवाईक म्हणजे बहीण, भाऊ व मुलेबाळे इ. असेल.

इस्लामच्या पूर्ण कौटुंबिक व्यवस्थेला अंमलात आणले गेले तर वरवर दिसणारा हा भेद दिसून येणार नाही. इस्लामने स्त्रीच्या नैसर्गिक कमजोरीमुळे तिला आर्थिक बाबतीत अधिकाधिक सक्षम केले आहे. परंतु पुरुषांची आर्थिक स्थितीही तशी इतकी सुरक्षित ठेवण्यात आलेली नाही. स्त्रीधनामध्ये स्त्रीचे महर तसेच लग्नात आलेल्या सर्व भेटवस्तूंचासुध्दा समावेश आहे.

येथे आणखी महत्त्वाची बाब ही आहे की इस्लाम संपूर्ण कुटुंबाची आर्थिक आणि शैक्षणिक जबाबदारी पुरुषावर टाकतो. विशेषत: आर्थिक जबाबदारी ज्यापासून स्त्री अगदी स्वतंत्र आहे. एवढेच नाही तर इस्लाम स्त्रीच्या पालनपोषणाचा भार हा लग्नाअगोदर पुरुषावर आणि लग्नानंतर कुटुंबावर टाकतो. या परिस्थितीत दोघांना सारखाच वारसाहक्क देणे कोणता न्याय ठरू शकतो?

जिथे इस्लामने फक्त नातेसंबंधाचा विचार केला आहे तिथे स्त्री आणि पुरुषांना समान दर्जा बहाल केला आहे. जसे मृताच्या संततीच्या उपस्थितीत आईवडिलांचा वारसाहक्क समसमान आहे.

दुसरा कायदा या बाबतीत शरियतने सांगितला आहे तो म्हणजे जवळचा नातेवाईक हदीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे,

''वारसाहक्काला वारसापर्यंत पोहचवा आणि जे काही शिल्लक राहील ते जवळच्या पुरुष नातेवाईकाचा हिस्सा असेल.''

वारसाहक्काबद्दलचा हा नियम वरकरणी वाचकाच्या मनात संभ्रम निर्माण करतो. इस्लामच्या आर्थिक व्यवस्थेच्या एका महत्त्वाच्या पैलूवर लक्ष दिल्यास चित्र स्पष्ट होते ते म्हणजे इस्लामने पुरुषावर आर्थिक संपूर्ण बोजा (भार) टाकूनसुध्दा कुटुंबातील संबंध सरळ व व्यवस्थित राखण्याची जबाबदारीसुध्दा टाकली आहे. याला कायदेशीर आणि संविधनात्मक महत्त्व आहे. जर एखादी व्यक्ती आर्थिक अडचणीत असेल तर त्याची मदत करणे हे जवळच्या नातेवाईक पुरुषाचे कर्तव्य ठरते.

वारसाहक्कासाठी नातेसंबंधाना महत्त्व देण्यात आले आहे. मृत व्यक्तीच्या जवळची नातेवाईक स्त्री लांबच्या पुरुषापेक्षा जास्त प्रमाणात वारसाहक्क प्राप्त करते. उदा. एक व्यक्ती आपल्या मागे एक पत्नी, एक मुलगी, एक बहीण आणि एक चुलता सोडून जातो. येथे इस्लामी वारसाहक्कानुसार त्याच्या संपत्तीतून पत्नीला १/४ मुलगी अथवा बहीण १/२ आणि चुलत्याला १/४ हिस्सा मिळेल. वारसाहक्कासंबंधीचे कायदेकानू कुरआनमध्ये अगदी स्पष्ट करण्यात आले आहे,

''तुमच्या संततीविषयी अल्लाह तुम्हाला आदेश देत आहे,

(१) पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांच्या बरोबर आहे.

(२) जर (मृताचे वारस) दोनपेक्षा जास्त मुली असतील तर त्यांना वारसासंपत्तीपैकी २/३ दिला जावा.

(३) आणि जर एकच मुलगी वारस असेल तर १/२ हिस्सा तिचा आहे.

(४) जर मुलास संतती असेल तर त्याच्या आईवडिलांपैकी प्रत्येकाला वारसासंपत्तीचा सहावा वाटा मिळाला पाहिजे.

(५) आणि जर तो नि:संतान असेल आणि आईवडीलच त्याचे वारस असतील तर आईला १/३ वाटा दिला जावा.

(६) आणि जर मयताचे भाऊ-बहिणीसुध्दा असतील तर आई १/६ हिश्याची वाटेकरी असेल.

(या सर्व वाटण्या त्या वेळी काढल्या जातील) जेव्हा मृत माणसाने केलेले मृत्यूपत्र पूर्ण केले गेले असेल आणि त्याच्यावर असलेले कर्ज अदा केले गेले असेल. तुम्हाला माहीत नाही की तुमचे आईवडील व तुमच्या संततीपैकी कोण लाभाच्या दृष्टीने तुमच्या अधिक जवळ आहे. हे हिस्से अल्लाहने ठरवून दिलेले आहेत, आणि अल्लाह नि:संशय सर्व हकीगती जाणणारा आणि सर्व गर्भित हेतु जाणणारा आहे."

(कुरआन-४:११)

वारसाहक्काबद्दल हे मूलभूत कायदेशीर आदेश आहेत की पुरुषाचा हिस्सा स्त्रीपेक्षा दुप्पट आहे कारण शरियतने कौटुंबिक आर्थिक जबाबदारी पुरुषावर टाकली आहे. आणि आर्थिक जबाबदारीच्या ओझ्यापासून स्त्रीला मुक्त केले आहे. म्हणून हेच न्यायपूर्ण आहे की वारसाहक्कात स्त्रीचा हिस्सा पुरुषापेक्षा कमी ठेवला जावा.

पालनपोषणाचा हक्क

अल्लाहचा आदेश आहे,

"सुखवस्तु व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे आणि गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे परिचित पध्दतीनुसार द्यावे. हा हक्क आहे सदाचारी लोकांवर."(कुरआन-२:२३६)

स्त्रीला निरनिराळ्या पध्दतीने जी संपत्ती प्राप्त होते. त्यावरच्या मिळकतीचे सर्व हक्क तिला बहाल करण्यात आले आहेत. ज्यात ढवळाढवळ करण्याचा हक्क तिच्या पित्याला आणि पतीलासुध्दा नाही. ती जर आपला पैसा व्यापारात लावते अथवा मेहनत करून कमावते तर त्या कमाईची ती एकटीच हकदार आहे. अशा स्थितीत तिच्या पालनपोषणाचा भार पतीवरच आहे. जर पती आपल्या पत्नीला पालनपोषणाचा खर्च देत नसेल तर दोन स्थितीतच. एक त्याची कुवत नसेल आणि दुसरी कुवत असून देत नसेल.

जर कुव्वत नसेल तर काही काळ (दोन-तीन महिने इ.) वाट पाहावी. त्याने तिच्या भरणाचा भार उचलला नाही तर त्याच्यापासून वेगळे व्हावे. तलाक दिला जावा.

मुळात असून देत नाही तर हा अत्याचार आहे. कुरआननुसार पत्नीचे पालनपोषण पतीवर अनिवार्य आहे आणि कोणी ऐपत असून हक्क अदा करत नसेल तर पत्नीला अशा पतीपासून विभक्त होणे (खुलअ करणे) योग्य आहे.

महेर (स्त्रीधन) चा हक्क

अल्लाहचा आदेश आहे,

"आणि स्त्रियांचे महेर (स्त्रीधन) आनंदाने (कर्तव्य समजून) अदा करा. परंतु जर त्यांनी स्वत: स्वखुषीने स्त्रीधनाचा काही अंश तुम्हाला माफ केला तर तुम्ही तो भाग आनंदाने खाऊ शकता." (कुरआन-४:४)

महेर (स्त्रीधन) त्याला म्हणतात की जे लग्नकरार करतेवेळी बदल्यात दिला जातो अथवा देण्याचे कबूल केले जाते. ते कोणत्याही परिस्थितीत पुरुषाने स्त्रीला द्यावे लागते. आदरणीय उमर (रजि.) यांचा निर्णय आहे की जर पत्नीने आपल्या पतीला पूर्ण महेर अथवा त्याचा काही भाग माफ केला आणि काही काळाने पुन्हा माफ केलेल्या भागाचा तिने आग्रह धरला तर पतीला ते द्यावे लागले, कारण ती आपला महेर माफ करू इच्छित नाही हे सिध्द होते. कुरआनोक्ती आहे,

"जर तुम्ही स्त्रियांना भरपूर धनसंपत्ती दिली तर त्यातून काहीही तुम्ही परत घेऊ नका." (कुरआन – सूरह निसा)

कुरआन या बाबीवर जोर देत आहे की पुरुष स्त्रीशी विभक्त होण्याअगोदर तिचा महेर त्याने चुकता करावा, ज्या स्त्रियांशी निकाह (लग्न) करणे योग्य आहे, अशांच्या बाबतीत कुरआन स्पष्ट आदेश देत आहे,

"यांच्याखेरीज इतर ज्या स्त्रिया आहेत त्यांना आपल्या संपत्तीद्वारे प्राप्त करणे तुमच्यासाठी वैध करण्यात आले आहे, परंतु अट अशी की त्यांना विवाहबंधनात सुरक्षित करा, असे नव्हे की तुम्ही स्वच्छंद कामतृप्ती करू लागाल. मग ज्या दांपत्यजीवनाचा आनंद तुम्ही त्यांच्यापासून घ्याल त्याच्या मोबदल्यात त्यांचे महेर (स्त्रीधन) कर्तव्य समजून अदा करा. परंतु महेरचा ठराव केल्यानंतर परस्परांच्या राजीखुषीने तुमच्यामध्ये जर काही तडजोड निघाली तर त्याला काही हरकत नाही. अल्लाह सर्वज्ञ व बुध्दिमान आहे." (कुरआन-४:२४)

महेरचा हक्क अदा करण्यासाठी श्रध्दावंत पुरुषांना अल्लाह तंबी देत आहे,

"हे श्रध्दावंतानो! तुमच्याकरिता हे वैध नाही की तुम्ही बळजबरीने स्त्रियांचे वारस बनावे, आणि हेदेखील वैध नाही की त्यांना प्रश्न करून त्या स्त्रीधनाचा काही भाग तुम्ही हिरावून घेण्याचा प्रयत्न कराल, जो तुम्ही त्यांना देऊन टाकला आहे."

(कुरआन-४:१९)

ज्यांचे महेर कुवतीपेक्षा जास्त लिहिण्यात आले आहेत त्यात समझोत्याची एकच वाट आहे की त्याने आपल्या पत्नीला राजीखुषीने महेरची रक्कम कमी करण्यास सांगावे आणि तिने आपल्या इहलोक व परलोक दोघांचा विचार करून महेर कमी करण्यास मान्यता द्यावी जेणेकरून राहिलेली रक्कम पतीने सहजतेने अदा करावी. अशा प्रकारे दोन्ही शांततेत जीवन जगतील. महेर एक प्रकारचे कर्ज आहे आणि कर्जाला अल्लाह परलोकात माफ करणार नाही. प्रेषित मुहम्मद (स.) यांचा आदेश आहे,

''ज्याने महेर निश्चित करून स्त्रीशी लग्न केले आणि मनात हे निश्चित केले की मी महेर देणार नाही तर अशी व्यक्ती व्यभिचारी, बलात्कारी आहे. महेरची माफी फक्त स्त्रीच्या हातात आहे.''

कुरआनोक्ती आहे,

''जर स्त्रीने सवलत दिली तर.''

स्त्रीला हक्क आहे म्हणून महेर त्याच वेळी माफ होईल जेव्हा पत्नी स्वत: माफ करील. कुरआनोक्ती आहे,

''जर स्त्रीने स्वखुषीने काही हिस्सा माफ करावा.''

दबाव आणि लालच देऊन स्त्रीला महेर माफ करण्यास विवश केले जाऊ शकत नाही. महेर निश्चित केला नसेल तर काही जरूर द्यावे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

''तुम्हावर काही गुन्हा नाही की तुमच्या पत्नींना तुम्ही तलाक द्यावी यावेळेपूर्वी की त्यांना स्पर्श करण्याची घटका येईल अथवा महेर ठरविला असेल. अशा स्थितीत त्यांना काहीना काही अवश्य दिले पाहिजे. सुखवस्तु लोकांनी आपल्या ऐपतीप्रमाणे व गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे परिचित पध्दतीनुसार द्यावे. हा हक्क आहे सदाचारी लोकांवर.'' (कुरआन-२:२३६)

वरील आदेश त्या स्त्रीसाठी आहे जिला पतीने हाथ लावला नाही आणि जर विवाहबंधनात आहे तर प्रचलित पध्दतीनुसार ऐवतीप्रमाणे द्यावा. स्त्री आपल्या मिळकतीवर पूर्ण अधिकार राखून आहे. जर स्त्रीने व्यापारउदीमाद्वारे संपत्ती प्राप्त केली तर ती तिची संपत्ती आहे. अशा स्थितीतसुध्दा तिचे पालनपोषण तिच्या पतीवरच राहते, मग स्त्री कितीही मालदार वा श्रीमंत असो. पती नसल्याने बाप, भाऊ अथवा अन्य पालकांवर ही जबाबदारी येते. अशा प्रकारे इस्लाममध्ये स्त्रीची आर्थिक परिस्थिती इतकी दृढ आहे की कधीकधी ती पुरुषांपेक्षा जास्त चांगल्या स्थितीत असते.

स्त्री स्वसंरक्षण हक्क

दिवाणी आणि फौजदारी कायद्यात स्त्री आणि पुरुषामध्ये फरक केलेलाच नाही. तिच्या मर्जीनुसार लग्न करण्याची परवानगी दिली. पसंत आणि नापसंदचे आदेश दिले आणि नापसंत पतीशी खुलअ करण्याचा आदेश दिला. कुरआनोक्ती आहे,

"नंतर जर तुम्हाला भय वाटत असेल की ते दोघे अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादांवर कायम राहू शकत नसतील तर त्यांच्यामध्ये असा समेट घडविण्यामध्ये कोणताही अपराध नाही की पत्नीने आपल्या पतीला प्रतिदान देऊन स्वत:ला मुक्त करून घ्यावे. या अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादा आहेत, त्यांचे उल्लंघन करू नका आणि जे या मर्यादांचे उल्लंघन करतील ते नि:संशय अत्याचारी आहेत." (कुरआन-२:२२९)

इस्लामने ज्याप्रमाणे पुरुषांना हा अधिकार दिला आहे की जर पत्नीशी कोणत्याही स्थितीत निभाव लागणे अशक्य आहे तर तो तिला तलाक देऊ शकतो. याचप्रमाणे स्त्रीलासुध्दा हा अधिकार देण्यात आला आहे की जर ती पतीची निराश आहे आणि सहजीवन यापुढे अशक्य आहे तर ती प्रतिदान देऊन खुलअ (विभक्त होणे) करू शकते. तलाक घेऊ शकते. ही तलाक स्त्रीने प्रतिदान देऊन खरेदी केली आहे. म्हणून पतीला इद्दतच्या काळात रुजू करण्याचा अधिकार राहात नाही. जर कालांतराने हे दोघे एकमेकांशी पुन्हा राजी झाले तर आणि दुसऱ्यांदा निकाह करू इच्छितात तर तसे ते करू शकतात.

खुलअसंबंधी जर स्त्री-पुरुषादरम्यान घरातच काही निर्णय झाला तर त्यावर ते दोघे निर्णय घेऊ शकतात. परंतु जर कोर्टात गेले तर कोर्ट हे पाहील की स्त्री खरोखरच त्या पतीपासून इतकी बेजार झाली आहे की विभक्त होऊ इच्छिते. नंतर प्रतिदान स्त्रीपासून जमा करून पतीला त्याचा स्वीकार करावा लागेल व तलाक द्यावा लागेल.

कुरआननुसार स्त्रीला नापसंदपतीपासून विभक्त होण्यासाठी खुलअचा हक्क देण्यात आला आहे. पती अत्याचारी असेल तर तिला कोर्टातर्फे तसे करता येईल.

निकाहमध्ये पुरुषाप्रमाणेच स्त्रीला आपला जीवनसाथी निवड करण्याचा अधिकार दिला आहे. अल्लाहचा आदेश आहे,

"आपल्या पसंतीच्या स्त्रियांशी लग्न करा." (कुरआन-सूरह निसा)

निवडीचा अधिकार त्याला आहे जो निकाह करत आहे, मग स्त्री असो की पुरुष. इतर कुणालाही हा हक्क नाही की या दोघांच्या मर्जीविरुध्द त्यांना लग्नबंधनात

बांधून टाकावे आणि स्त्रीपासून ही अपेक्षा कशी केली जावी की तिने आपल्या मर्जीविरुध्द जीवनभर नापसंत पुरुषाबरोबर राहावे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचा आदेश आहे, विधवेशी विवाह तोपर्यंत केला जाऊ शकत नाही जोपर्यंत तिची संमती घेतली जात नाही. त्याचप्रमाणे कुमारिकाच्या मर्जीविरूद्धसुध्दा लग्न होऊ शकत नाही. स्त्री मौन धारण करणे म्हणजे संमती•दर्शविणे आहे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, वलीच्या परवानगीशिवाय मुलीचे लग्न होऊ शकत नाही. मुलासाठी वलीची गरज नाही. कारण कुरआनोक्ती आहे, "तुम्ही निकाह करा." हे शब्द वलीचे महत्त्व दर्शवितात आणि पुरुषांच्या बाबतीत हेच शब्द (तुम्ही निकाह करा) पुरुषांना निकाह करण्याची परवानगी देतात. स्त्रियांच्या बाबतीत कुरआनोक्ती आहे, "त्यांच्या पालकांच्या परवानगीने तिच्याबरोबर निकाह करा." यावरूनसुध्दा माहीत होते की वलीची परवानगी आवश्यक आहे.

पुरुषांना स्त्रियांबरोबर न्याय करण्याचा आदेश

अल्लाहचा आदेश आहे,

"जर तुम्हा (एका पेक्षा जास्त पत्नींशी) न्याय पूर्वक वागणूक ठेवण्यासाठी साशंक असाल तर एकच पत्नी ठेवा."

दुसऱ्या ठिकाणी आदेश आहे,

"तुम्हाला हे शक्य नसेल की पत्नींच्या दरम्यान न्यायपूर्ण वागणूक ठेवावी. एका पत्नीकडे इतके झुकावे की दुसरीकडे दुर्लक्ष होवून ती बेसहारा वाटावी. जर तुम्ही तुमची वागणूक न्यायपूर्ण ठेवाल आणि अल्लाहच्या कोपचे भय बाळगणारे आहात तर तोच तुमचे गुन्हे माफ करणारा आणि दयावंत आहे."

अर्थात, एक पुरुष कोणत्याच स्थितीत दोन अथवा त्यापेक्षा जास्त पत्नींबरोबर न्यायपूर्ण व्यवहार ठेवू शकत नाही. जर एक सुंदर तर दुसरी कुरूप तसेच एक जवान तर दुसरी वयस्कर असेल, एक अशक्त तर दुसरी सशक्त, एक स्वभावाने चांगली तर दुसरी स्वभावाने खडूस; अशा स्थितीत पुरुष स्वभावत: एकीकडे जास्त झुकलेला तर दुसरीकडे दुर्लक्ष करतो. अशा स्थितीत कायदासुध्दा तुम्हाला दोघांत प्रेम आणि शारीरिक संबंध सारखे ठेवा असे सांगत नाही तर त्या स्त्रीला पुरुषाने बेवारसी सोडू नये.

आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.)

आपल्या पत्नींमध्ये हक्कांचे वाटप समसमान करत असत आणि अल्लाहजवळ ही प्रार्थना सतत करत असत,

"हे अल्लाह! ही माझी वाटप पध्दत आहे, यावर माझा काबू आहे. हे अल्लाह, माझी याबाबत पकड करू नकोस, जे फक्त तुझ्या ताब्यात आहे आणि माझ्या ताब्यात नाही."

विधवेबरोबर सद्वर्तन

ज्या स्त्रियांचे पती मृत पावले असतील आणि त्या हलाखीचे जीवन जगत असतील तर त्यांच्याशी समाजसुध्दा चांगली वागणूक ठेवत नाही. त्यांना मानवी हक्कांपासून दूर ठेवले जाते. परंतु कुरआनने त्यांचे हक्क अबाधित राखले आहेत आणि समाजात त्यांना आदर-सन्मान दिला आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे श्रध्दावंतांनो! तुमच्यासाठी हे योग्य नाही की तुम्ही बळजबरीने विधवेला त्रास देण्यासाठी अटकून ठेवावे." (कुरआन-सूरह निसा)

अर्थ हाच आहे की जेव्हा एखाद्या स्त्रीचा पती मृत पावतो तर त्याच्या कुटुंबातील लोक तिला आपली मिरास समजून तिचे वारसदार बनून राहतात. जेव्हा तिचा पती मृत्यू पावला तर ती पूर्ण स्वतंत्र झाली आहे की जिथे आणि ज्याच्याशी ती निकाह (लग्न) करू शकते. कुणालाही हा हक्क नाही की तिच्यावर हक्क बजवावा अथवा तिच्या लग्नासाठी आडकाठी बनावे. कुरआन विधवेला आर्थिक पाठबळसुध्दा देते. अल्लाहचा स्पष्द आदेश आहे,

"आणि तुमच्यासाठी हे योग्य आहे की त्यांना त्रास देवून त्यांचा तो माल हडप करण्याचा प्रयत्न करावा जो तुम्ही तिला (लग्नात) दिला होता."
(कुरआन-सूरह निसा)

पतीच्या निधनानंतर तर ती जास्त दया करण्यास पात्र ठरते. पतीने आपल्या जीवनात जी संपत्ती आणि महेर तिला दिले होते ते नातेवाईकांनी कपटाने तिच्याकडून हिसकावून घ्यावा, हे अत्यंत वाईट कृत्य आहे. विधवेच्या रक्षणासाठी तिचा पुनर्विवाह करण्याची ताकिद अल्लाहने केली आहे,

"आणि तुमच्यात ज्या स्त्रीया विधवा आहेत त्यांचे लग्न करून टाका."

एका बेवारस विधवेसोबत सर्वांत उत्तम वागणूक ही आहे की तिचा जोडा शोधून

तिचे योग्य ठिकाणी लग्न लावून द्यावे, ज्यानुसार तिला पूर्ण संरक्षण प्राप्त होईल, कारण एका स्त्रीचा वास्तविक रक्षक, मित्र, मदतगार एक चांगला पतीच असू शकतो.

तलाकपीडित स्त्रीबरोबर सद्‌वर्तन

घटस्फोट दिलेल्या स्त्रीबरोबर जरी पतीचा संबंध राहात नाही तरी इस्लामने तिच्याशी सद्‌वर्तणूक ठेवण्याची ताकीद केली आहे आणि तिचेसुध्दा काही हक्क आबाधित केले आहेत. यावरून हेच सिध्द होते की इस्लाम एक न्यायप्रिय, मानवताप्रिय, चारित्र्यसंपन्न अशी जीवनप्रणाली आहे. मानवी समाजासाठी ही जीवनशैली एक कृपानिधी आहे. अल्लाहचा आदेश आहे,

"(त्यांना इद्दतच्या काळात) त्याच जागी ठेवा जेथे तुम्ही राहता, जशी जागा तुम्हाला उपलब्ध असेल आणि त्यांना अडचणीत आणण्यासाठी त्रास देऊ नका."
(कुरआन-६५:६)

कुरआनमध्ये पुरुषांना याची ताकीद करण्यात आली आहे की इद्दतच्या काळात स्त्रियांना घरातून बाहेर काढू नका. अल्लाहचा आदेश आहे,

"आणि अल्लाहच्या कोपाचे भय बाळगा जो तुमचा पालनकर्ता आहे, (इद्दतच्या कालावधीत) न तुम्ही त्यांना त्यांच्या घरातून काढा न त्यांनी स्वत: निघावे. याव्यतिरिक्त की त्यांच्याकडून एखादा उघड व्यभिचार घडला असेल." (कुरआन-६५:१)

उघड व्यभिचार म्हणजे दुराचार, चोरी, शिवीगाळ, भांडणतंटा इत्यादी. त्यांना आर्थिक संरक्षण दिले आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"ज्या स्त्रियांना घटस्फोट देण्यात आला असेल त्यांनादेखील योग्य प्रकारे काहींना काही देऊन निरोप देण्यात यावा हा हक्क आहे अल्लाहच्या कोपाचे भय बाळगणाऱ्या लोकांवर."
(कुरआन-२:२४१)

"आणि जर त्या गर्भवती असतील तर त्यांच्यावर त्या वेळेपर्यंत खर्च करीत राहा जोपर्यंत त्या गर्भमुक्त होत नाहीत. मग जर त्या तुमच्यासाठी (बाळाला) दूध पाजतील तर त्याचा मोबदला त्यांना द्या."
(कुरआन-६५:६)

इद्दत पूर्ण झाल्यानंतर लग्न करण्याची परवानगी द्या. अल्लाहचा आदेश आहे,

"जेव्हा तुम्ही आपल्या पत्नींना तलाक द्याल आणि त्या प्रतीक्षाकाळ पूर्ण करतील तेव्हा त्यांच्या नियोजित वरांशी विवाह करण्यापासून प्रतिबंध करू नका, जेव्हा

ते संमतीपूर्वक एकमेकांशी विवाह करू इच्छित असतील. तुम्हाला उपदेश देण्यात येत आहे की असे कृत्य मुळीच करू नका जर तुम्ही अल्लाह आणि अंतिम दिनावर श्रध्दा ठेवणारे असाल. तुमच्यासाठी पवित्र आणि पावन पध्दत हीच आहे की तुम्ही यापासून परावृत्त राहावे. अल्लाह जाणतो पण तुम्ही जाणत नाही.'' (कुरआन-२:२३२)

अर्थ असा आहे की जर एखाद्या पतीने आपल्या पत्नीला तलाक दिला आणि इद्दतच्या काळात त्यांच्यात समेट झाला नाही. मग इद्दतचा काळ संपला तर दोघे आपापसात दुसऱ्यांदा लग्न करू शकतात आणि त्यात कोणीही आडकाठी घालू नये. तसेच स्त्रीला तलाक दिला आणि इद्दतकाळ संपून गेला असेल तर ती स्त्री आपल्या पहिल्या पतीपासून स्वतंत्र होऊन दुसरीकडे आपला निकाह करू इच्छिते तर त्याच्या पहिल्या पतीने तिच्या दुसऱ्या विवाहासाठी आडकाठी बनू नये. ही अत्यंत घृणास्पद गोष्ट आहे. कुरआनोक्ती आहे,

''आणि तुमच्यासाठी हे वैध नाही की जे काही तुम्ही त्यांना दिले आहे त्यातून काहीही परत घ्यावे.'' (कुरआन-२:२२९)

पतीने दिलेले दागदागिणे, कपडे, भेटवस्तु, मेहेर तसेच इतर संपत्ती त्या स्त्रीचे स्त्रीधन आहे. हे स्त्रीधन कोणीहीं आणि कोणत्याही परिस्थितीत तिच्यापासून परत घेऊ शकत नाही. पतीने तलाक दिल्यानंतरसुध्दा!

इस्लामने ज्या उच्च नैतिक तत्त्वांचे शिक्षण दिले आहे त्यानुसार हे अगदी घृणास्पद आहे की कुणाला देऊन टाकलेले त्याच्यापासून कालांतराने पुन्हा परत घ्यावे. हदीसमध्ये या कृत्याला ही उपमा दिली आहे की एखाद्याने उलटी करावी आणि नंतर ती चाटावी. विशेषत: हे तर अत्यंत घृणास्पद आहे की पतीने आपल्या पत्नीला दिलेले सर्वकाही तलाक देताना तिच्याकडून परत घ्यावे. हे इस्लाम आणि कुरआनविरोधी कृत्य आहे. कुरआन मध्ये अल्लाहने आदेश दिला आहे की घटस्फोटित स्त्रीला सन्मानपूर्वक निरोप द्या, त्यांना जास्त अधिक देऊन, ही तीच स्त्री आहे जिने काही काळ तुमची पत्नी म्हणून वैवाहिक जीवन व्यतीत केले आहे.

स्त्रियांनी अल्लाहला दिलेले वचन

कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"हे नबी (स.)! जेव्हा तुमच्याजवळ श्रध्दावंत स्त्रिया बैअत (प्रतिज्ञा) करण्याकरिता येतील आणि या गोष्टीची प्रतिज्ञा करतील की त्या अल्लाहबरोबर कोणत्याही वस्तुला सामील करणार नाहीत. चोरी करणार नाहीत, व्यभिचार करणार नाहीत. आपल्या संततीची हत्या करणार नाहीत, आपल्या हातापायांपुढे कोणतेही कुभांड रचून आणणार नाहीत, आणि कोणत्याही चांगल्या कामात तुमची अवज्ञा करणार नाहीत, तर त्यांच्याकडे बैअत घ्या आणि त्यांच्या बाबतीत अल्लाहपाशी क्षमेची प्रार्थना करा, नि:संशय अल्लाह क्षमा करणारा आणि दया करणारा आहे." (कुरआन-६०:१२)

वरील आयत ही मक्का विजयापूर्वी अवतरित झालेली आहे. त्यानंतर जेव्हा मक्केवर विजय प्राप्त झाला तेव्हा कुरैशचे लोक मोठ्या प्रमाणात झुंडीने 'बैअत' (प्रतिज्ञा) घेण्यासाठी पुढे येऊ लागले. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी पुरुषांना सबा टेकडीवरून प्रतिज्ञा स्वत: दिली आणि आपल्यातर्फे आदरणीय उमर (रजि.) यांना नियुक्त करून स्त्रियांना प्रतिज्ञा दिली आणि त्या सर्व बाबींचा उल्लेख त्या प्रतिज्ञेत केला जो वरील आयतीत आला आहे. ईदच्या दिवशीसुध्दा प्रेषित मुहम्मद (स.) पुरुषांच्या दरम्यान प्रवचन (खुतबा) दिल्यानंतर स्त्रियांच्या समूहाकडे वळत. त्यांना प्रवचन देत आणि त्यात वरील आयतचे आवर्जून पठण करीत असत आणि त्यांच्याशी प्रतिज्ञा घेत ज्या बाबींचा उल्लेख आयतमध्ये आला आहे. याव्यतिरिक्त स्त्रिया वैयक्तिक अथवा सामुदायिकपणे येऊन प्रेषितांकडून प्रतिज्ञा घेत असत.

मक्का शहरात जेव्हा स्त्रियांकडून प्रतिज्ञा (बैअत) घेतली जात होती. त्या वेळी सुफियान यांची पत्नी हिन्दा बिन्ते ऊत्बा यांनी प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारले, "हे प्रेषित! अबु सुफुयान जरा कंजुषी करणारा आहे. मला हा गुन्हा होणार तर नाही ना की मी त्यांना न विचारता माझ्यासाठी आणि माझ्या मुलाबाळांसाठी त्यांच्या संपत्तीतून काही घ्यावे?" प्रेषितांनी आदेश दिला, "नाही! तुम्ही असे करू शकत नाही. परंतु फक्त आवश्यकतेनुसारच घ्यावा त्यापेक्षा जास्त नाही."

दुसऱ्यांना नावे ठेवण्यापासून स्त्रियांना रोखण्यात आले आहे. आरोप-प्रत्यारोप करण्यास मनाई करण्यात आली आहे. लांच्छन दोन प्रकारे लावले जाते. एक तोहमत म्हणजे परपुरुषाशी तथाकथित असल्या संबंधाबाबत खूप चर्चा करत राहाणे. स्त्रियांची ही फार मोठी कमजोरी आहे.

दुसरी तोहमत ही आहे की स्त्रीने दुसऱ्याच्या मुलाला जन्म द्यावा आणि पतीला पटवून द्यावे की हा तुझाच मुलगा आहे. प्रेषित मुहम्मद (स.) यांचा स्पष्ट आदेश आहे,

''जी स्त्री आपल्या कुटुंबात दुसऱ्याचे मूल आणील (म्हणजे ती पतीव्यतिरिक्त दुसऱ्याच्या मुलाला जन्म देईल) अशा स्त्रीचा अल्लाहशी काही एक संबंध नाही. अल्लाह तिला कधीही स्वर्गास्त करणार नाही.'' (अबू दाऊद)

वरील प्रतिज्ञेचा (बैअत) पाचवा आदेश हा आहे की स्त्री सदाचारात प्रेषित मुहम्मद (स.) यांचा विरोध करणार नाही. यात मोठमोठे गुन्हे विशद करण्यात आलेले आहेत. परंतु सदाचारांची तशी यादी येथे दिली नाही आणि सांगण्यात आले प्रेषित तुम्हाला ज्या सदाचारांचा आदेश देतील त्यावर आचरण करा. आता हे सदाचार अल्लाहने दिलेल्या आदेशाप्रमाणे किंवा कुरआनच्या आदेशाप्रमाणेसुध्दा आहेत. परंतु येथे तुम्ही अल्लाहची नाफरमानी अथवा कुरआनची नाफरमानी करू नका. अशी प्रतिज्ञा घेण्याऐवजी प्रतिज्ञा घेतली जाते की प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आदेश पाळा.

यावरून हेच स्पष्ट होते की समाजसुधार करण्यासाठी अल्लाहने प्रेषित मुहम्मद (स.) यांना पूर्ण अधिकार दिले होते आणि त्यांचे सर्व आदेश पालन करण्यास सक्त ताकीद दिली. मग ते आदेश कुरआनमध्ये असोत अथवा नसोत. याच आधारावर प्रेषित मुहम्मद (स.) यांनी प्रतिज्ञा (बैअत) घेताना तात्कालिन अनेक सामाजिक दुराचारांचा त्याग करण्याची शपथ दिली. विशेषत: स्त्रियांमध्ये त्याकाळी अत्यंत वाईट कुप्रथा आणि दुराचार फोफावला होता, ज्यामुळे समाज मृतवत झालेला होता. उदा. कोणी मेल्यानंतर त्यावर स्त्री नोहा (मातम) करणार नाही, तसेच नटूनथटून बाहेर पडणार नाही. आपल्या पतीशी धोकेबाजी करणार नाही. त्याच्या संपत्तीला दुसऱ्यावर खर्च करणार नाही इत्यादी.

प्रेषितांच्या काळात स्त्रियाशी प्रतिज्ञा घेण्याची पध्दत ही पुरुषांपेक्षा वेगळी होती. स्त्रियांशी प्रतिज्ञा (बैअत्त) करते वेळी प्रेषित (स.) यांनी कधीही स्त्रियांचा हात आपल्या हातात घेतला नाही. आदरणीय माता आयेशा (रजि.) यांचे स्पष्टीकरण आहे, ''प्रतिज्ञा करताना प्रेषित मुहम्मद (स.) यांचा हाताने कधीही स्त्रीच्या हाताला स्पर्श केला नाही. ते स्त्रियांशी प्रतिज्ञा घेताना तोंडी स्पष्ट करीत की मी प्रतिज्ञा घेतली.'' (बुखारी)

प्रेषित मुहम्मद (स.) एकदा ईदचा खुतबा (प्रवचन) देत असताना पुरुषांना ओलांडून स्त्रियांकडे गेले आणि त्यांना खुतबा दिला. त्यांनी कुरआनची वरील आयत पठण केली आणि नंतर स्त्रियांना विचारले, ''तुम्ही याची प्रतिज्ञा घेता काय?'' स्त्रियांच्या समूहातून एका स्त्रीने उत्तर दिले, ''होय, हे प्रेषित! आम्ही प्रतिज्ञा घेतली.''

स्त्रियांची जबाबदारी

अल्लाह अध्याय 'तहारेम'मध्ये आदेश देत आहे,

''हे लोकहो! ज्यांनी श्रध्दा ठेवली आहे, वाचवा स्वत:ला आणि आपल्या कुटूंबियांना त्या अग्नीपासून जिचे इंधन मनुष्य आणि दगड असतील. त्यावर अत्यंत तापट व कठोर स्वभावी दूत नमलेले असतील जे कधीही अल्लाहच्या आज्ञेचा भंग करीत नाहीत आणि जी काही आज्ञा त्यांना दिली जाते तिची ते अंमल बजावणी करतात. (त्यावेळी सांगितले जाईल की) हे अश्रध्दावंतांनो, आज निमित्ते पुढे करू नका. तुम्हाला तर तसाच बदला दिला जात आहे जसे तुम्ही आचरण करीत होता.''

(कुरआन-६६:६-७)

ही कुरआनोक्ती आम्हाला बजावून सांगत आहे की एका व्यक्तीची जबाबदारी फक्त स्वत:लाच अल्लाहच्या कोपापासून वाचविणे नाही तर ज्या नैसर्गिक व्यवस्थेने कुटुंबाचा प्रमुख म्हणून जबाबदारी टाकली आहे, कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबांचे व्यवस्थित प्रशिक्षण करणे, त्यांना योग्यरित्या प्रशिक्षित करून अल्लाहचा सच्चा दास बनविणे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. कुटुंबातील सदस्य जर नरकाच्या मार्गाने चालत असतील तर त्यांना जाणीवपूर्वक प्रयत्न करून त्यापासून परावृत्त करणे. त्यांना फक्त याचीच काळजी नसावी की त्यांची मुलेबाळे जगात सुख-समाधानात राहावीत, तर त्याहून जास्त त्याला ही काळजी असावी की ती मुलेबाळे नराकाग्नीचे इंधन बनून राहू नयेत. प्रेषित मुहम्मद (स.) यांचा आदेश आहे,

''तुमच्यापैक्षा प्रत्येकजण प्रजापती आहे. तो आपल्या प्रजेसाठी जबाबदार आहे. पुरुष आपल्या कुटुंबातील लोकांना जबाबदार आहे आणि त्याला त्यांच्याविषयी जाब विचारला जाईल. स्त्री आपल्या पतीच्या घराची आणि मुलाबाळांची योग्य देखभाल व प्रशिक्षण देण्यासाठी जबाबदार आहे. तिला त्याबाबतीत विचारले जाईल.''

इस्लामने स्त्रीला जे मानाचे स्थान समाजात दिले आहे. त्यानुसार मातेच्या रुपात, पत्नीच्या रूपात, मुलीच्या रूपात आणि आज्ञाधारकाच्या रूपात तिच्यावर मोठी जबाबदारीसुध्दा येते. या सर्व जबाबदाऱ्यांना पूर्ण करणे तिचे आद्यकर्तव्य ठरते.

श्रध्दावंत मातेचे प्रथम कर्तव्य आहे की तिने आपल्या मुलाबाळांना कुरआन व सुन्नत (प्रेषित मुहम्मद स. यांचे आदर्श जीवन) नुसार आचरण करण्यास शिकवावे.

श्रध्दावंत स्त्री सकाळी मंगलमय वातावरणात कुरआन पठण तर जरूर करते, परंतु तिला आपण काय वाचले हेच कळत नाही. अशा अनेक सुशिक्षित मुली आहेत त्या धार्मिकतेकडेसुध्दा झुकतात, परंतु इस्लाम एक धर्म आहे या पलीकडे त्यांना काहीच माहीत नसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना कुरआन व सुन्नतचे पूर्ण ज्ञान झालेले नसते. कुरआन पठण त्या आयुष्यभर विनाअर्थ चिंतन-मनन न करताच करत जातात. परिणामत: त्या कुविचारांकडे, भौतिकतेकडेच झुकलेल्या दिसतात. नाचगाणे, सिनेमा, टी.व्ही. पाहणे त्यांच्या दिनचर्येचा महत्त्वाचा भाग बनून आहे. या गोष्टींना त्या श्रध्दावंत स्त्रिया वाईट समजतच नाहीत. त्यामुळे याचा प्रभाव त्यांच्या घरात दिवसेंदिवस वाढतच जातो. त्यांच्या तरूण मुली फॅशनच्या आहारी जातात व आपले देहप्रदर्शन करण्यास वाईट समजत नाहीत. अशा स्थितीत श्रध्दावंत आईची जबाबदारी वाढते. तिला आपल्या मुलाबाळांना या नरकाग्नीपासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते.

कुरआन व हदीस हे फक्त पुण्यप्राप्तीसाठी आयुष्यभर विनाअर्थ वाचत राहणे आता मुस्लिम (श्रध्दावंत) स्त्रीने सोडून दिले पाहिजे. तिने कुरआन पठण सार्थक केले पाहिजे. त्यावर चिंतन मनन करून कुरआन आदेशांना आपल्या जीवनव्यवहारात कार्यान्वित केले पाहिजे. आपल्या जीवनाचा आरसा म्हणून कुरआनला सतत पुढे ठेवले पाहिजे. अशा प्रकारे मुस्लिम स्त्रीने आपल्या जीवनाला इस्लामनुसार घडविले पाहिजे. अज्ञानमूलक विचार-आचारांना तिलांजली देऊन आपले पूर्ण जीवन इस्लामच्या शिकवणीनुसार परिवर्तीत झाले पाहिजे, तरच मुस्लिम कुटुंब, मुस्लिम समाज हा इस्लामच्या पूर्ण अधीन होईल अन्यथा नाही. इस्लाम ही एक परिपूर्ण व आदर्श जीवनशैली आहे, याचे प्रत्यंतर जगाला घडवून देण्याच्या कार्यात मुस्लिम स्त्रीचा मोलाचा वाटा आहे.

तिने आपल्या घराला घरपण दिले पाहिजे. अज्ञानमूलक प्रथा आणि विचारांना थारा दिला जाऊ नये. आधुनिक काळातील पाश्चात्यांचे अंधानुकरण त्वरित थांबवून या कुप्रथेपासून घर पवित्र करणे तिच्याच हातात आहे.

तिसरे कार्य आहे तिने आपल्या मुलाबाळांना इस्लामी शिक्षण द्यावे आणि तिने काळजी घेत राहावी की घरातील प्रत्येक व्यवहारात व दैनंदिन कामात इस्लाम व्यावहारिक रूपात प्रकट व्हावा आणि मुलांसाठी एक इस्लामी आदर्श त्यांच्या डोळ्यांसमोर सतत राहावा. उपासनेचा (नमाज, रोज़ा इ.) मतितार्थ त्यांनी जाणून घ्यावा.

त्यांच्या मनात इस्लाम घर करून राहावा आणि इस्लामबद्दल त्यांच्या मनात प्रेम निर्माण व्हावे. ते शीलवान बनावेत. या महत्‌कार्यासाठी स्त्रीने आपली कोख आणि आपल्या घरांना इस्लामच्या रंगात रंगून घ्यावे, ज्यामुळे त्या कुटुंबात एक मुस्लिम (आज्ञाधारक) पिढी निर्माण होईल.

मुस्लिम स्त्रीचे हे काम आहे की तिने आपल्या कुटुंबातील पुरुषमंडळींना इस्लामी जीवनपध्दतीकडे आकृष्ट करून घ्यावे. स्त्रियांमध्ये हा गैरसमज आहे की त्या पुरुषांवर प्रभाव पाडू शकत नाहीत. वस्तुस्थिती ही आहे की स्त्रिया पुरुषांवर खोलवर प्रभाव पाडू शकतात. मुस्लिम स्त्री असे म्हणत असेल की तिला प्रेषित मुहम्मद (स.) आणि माननीय अबू बकर (र.) यांचे पवित्र जीवन पसंत आहे, परंतु चर्चिल आणि डार्विनचे तोंड पाहणे पसंत नाही. आपण पाहाल की कालांतराने त्या कुटुंबातील मुलांचे चेहरे बदलू लागतील. मुस्लिम स्त्रीने इस्लामी जीवनपध्दतीचा आग्रह धरला– ज्यात नमाज, रोजा, सदाचरण, चारित्र्य घडण इ.चा समावेश आहे– तर आपण पाहाल की त्या कुटुंबातील पुरुषांचे जीवन बदलू लागेल. मुस्लिम स्त्रीने बजावून सांगितले की तिला निषिद्ध कमाईने रंगविलेले व सजविलेले दिवानखाने नापसंत आहेत, तसेच लाच खोरी, भ्रष्टाचाराने ऐशोआरामाचे जीवन नापसंत आहे, तिला वैध अल्प कमाईतून झोपडीत राहणे व कोरडी भाकर खाणे पसंत आहे. आपण पाहाल की भ्रष्टाचार, दुराचार त्या कुटुंबातून नष्ट होईल. अशा प्रकारे अनेक सामाजिक समस्या नाहिशा होताना आपण पाहाल. या सर्व स्त्रिया ज्यांनी इस्लामला आपली जीवनशैली स्वीकारून कुटुंबाची सुधारणा करण्याची चळवळ सुरु केली तर कुटुंबातून पर्यायाने समाजातून दुराचार नाहिसा होण्यास वेळ लागणार नाही. तसेच घर, कुटुंब आणि समाज अज्ञानकाळातील चालीरीती, दुराचार आणि आधुनिक दुराचारांपासून पवित्र होऊन जाईल. यालाच दुसरे नाव 'घराला घरपण देणे' आहे. अशा प्रकारे मुस्लिम स्त्रियांनी अज्ञानकाळातील प्रचलित कुप्रथांना थारा देता कामा नये. घरातील लोकांना इस्लामचे आदेश व सीमारेषा स्पष्ट करून द्याव्यात आणि स्वत:सुध्दा इस्लामच्या सीमारेषांचे उल्लंघन करू नये. इस्लामच्या आदेशांवर आपले आचरण ठेवून कुटुंबापुढे एक आदर्श निर्माण करावा. प्रत्येक मुस्लिम घरात काम सुरू झाल्यास घराला घरपण तर येईलच पण पूर्ण समाजाचे चित्र पालटून जाईल. म्हणून एका आदर्श समाजनिर्मितीसाठी मुस्लिम स्त्रीने पुढे येणे काळाची गरज आहे.

❊ समाप्त ❊